# श्री साईलीला



श्री बाबा दर दिवशी स्वतः माधुकरी मागत.



जून ] किं. १ रु. [ १९८०

उदी विशेषांक

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

'बोलेल तो करील काय ।
गरजेल तो बरसेल काय' ।
या रूढ म्हणीचा प्रत्यय ।
विना व्यत्यय साई दे ॥ ११५ ॥

बाबांसारिख्या अवतार मूर्ति ।
परोपकारार्थ जगीं अवतरती ।
होतां इच्छित कार्या समाप्ती ।
अंतीं अव्यक्तीं समरसती ॥११६॥

आम्हां न ठावें मूळ कारण ।
कोठूनि आलों कोठें प्रयाण ।
किमर्थ आम्ही झालों निर्माण ।
काया कीं प्रयोजन जन्माचें ॥११७॥

बरें स्वच्छंदें जन्म कंठला ।
पुढें मृत्यूचा समय आला ।
सकळ इंद्रिय गण विकळ झाला ।
तरीही न सुचला सुविचार ॥११८॥

तैसे नव्हती संतजन ।
तेतों अत्यंत सावधान ।
अंतकालाचें पूर्ण ज्ञान ।
ठावें निजनिर्वाण तयांतें ॥११९॥

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ३९ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

✻

वर्ष ५९ वे ] जून १९८० [ अं. ३

✻

: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

✻

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

✻

वार्षिक वर्गणी रु. १०–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक १ रु. फक्त.

✻

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका—जून १९८०


१) संपादकीय — संतांचे निदान स्मरण तरी करा
२) धन्य ते शिर्डी क्षेत्र — श्री. रामचंद्र कृष्णा पोकळे
३) श्रीसाई एक अवतार — श्री. गंगाधर रा. भट
४) माझी साई भक्ती — श्री. एन. जी. परुळेकर
५) भक्त भाव व श्रीसाई दर्शन — श्री. रामचंद्र काळे
६) श्रीसाई एक अवतार — सौ. उषा अधिकारी
७) श्रीसाई एक अवतारी पुरुष — श्री. हेमंत खेडेकर
८) निष्काम कर्मयोगी-श्रीबाबा — श्री. महादेव भिडे
९) माझी साई भक्ती — सौ. कौमुदी आजगावकर
१०) श्रीसाई एक अवतार — श्री. सुरेश सातपुते
११) माझी साई भक्ती — श्री. किशोर सूर्यवंशी
१२) श्रीसाई एक अवतार — सौ. निर्मला देशपांडे
१३) माझी साई भक्ती — श्री. आत्माराम साठे
१४) साई तारी त्याला कोण मारी — श्री. विजय मेहता
१५) एक अपूर्व यश — द. चि. पाठक
१६) प्रा. द. दि. परचुरे यांना श्रद्धांजलि — संपादक
१७) मी शिर्डीला काय पाहिले — कु. सुगंधा कौंडिण्य
१८) शिरडी वृत्त एप्रिल १९८० —
१९) श्रीसाई आशिष । उदीत भरले — श्री. वि. वा. कौलगेकर
२०) संतश्रेष्ठ साईबाबा — ,, ,,
२१) सुदिन भाग्याचा — श्री. स. मा. मुन्हार
२२) दिसो लागे मज पंढरीची वाट — श्री. महादेव द. साने
२३) साईमंदिरी उठे साई साई निनाद — श्री. रमाकांत पंडित
२४) पावते समाधी तुझी साईनाथा — श्री. ग. रा. पालकर
२५) आस — डॉ. इंदू नाईक
२६) साई स्मरण — डॉ. ग. स. कामत
२७) श्रीसाईनाथाय नमः — साईदास
२८) श्रीसाईनाथा—दयाघना — उज्वल वामनराव कुळकर्णी
२९) ॐ श्रीसाई नाम जपूया — श्री. विलास पडवळ
३०) साईबाबा रमावर — ,, ,,
३१) तुमको लाखो प्रणाम — सौ. सरला सु. गर्जे

संपादकीय –

स. न. वि. वि

# संतांचे निदान स्मरण तरी करा

आदमको खुदा मत कहो आदम खुदा नहीं ।
लेकिन खुदा के नूरसे आदम जुदा नहीं ॥

असे हिंदीमध्ये म्हटले आहे. धर्म म्हणजे केवळ पूजा अर्चा, धूपगंध इ. उपचार नव्हे तर माणसाने माणूस म्हणून कसे वागावे याचा जो संदेश तो धर्म. म्हणूनच हिंदु धर्म हा डबक्यात कोंडल्यासारखा नाही. वाहात्या पवित्र गंगेसारखा आहे. कालमानाप्रमाणे अनेक धर्म श्रेष्ठींनी अनेक उपदेश केले आणि ते सर्व हिंदु धर्मात सामावले गेले. अशा या श्रेष्ठ धर्मावर संकट येणे म्हणजे तरी काय याची निश्चित व्याख्या करणे अवघड आहे. परंतु तात्पर्य मर्त्य मानवाला आपल्या कर्तव्याची, धर्माची आठवण करून देण्यासाठी, हिंदु धर्माचे आणि भारताचे हे श्रेष्ठ, विशुद्ध पवित्र रूप कायम राखण्यासाठी ईश्वर मानव रूपाने आपल्यात अवतार घेतो अशी आपली ठाम समजूत आहे, श्रद्धा आहे.

संतांच्या बाबतीत अतिशय समृद्ध असलेल्या महाराष्ट्राच्या खडकाळ राकट मायभूमीने आजवर अनेक संत आपल्या कुशीत वाढविले. नुसते वाढविले नाही तर त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीने त्यांची किर्ती त्यांचा उपदेश, त्यांचे महात्म्य साऱ्या जगाला दशदिशातून आजवर सांगत आली आहे. १२ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत शेकडो संत येथे निर्माण झाले आणि त्यांनी आपल्या शिकवणूकीने, उपदेशाने ते अजरामर झाले.

ज्यांचे अंगी लोकोत्तर गुण व कर्तृत्व असते अशाना अवतारी पुरुष आपण मानतो. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, चोखा, रामदास, तुकाराम इ. संतांची मालिका पाहिली म्हणजे कुणाचेही मस्तक त्यांचे समोर विनम्रच होते. अगदी आधुनिक काळातले संत म्हणजे श्रीगजानन महाराज, अक्कलकोट स्वामी, श्री. गोंदवलेकर महाराज, श्री माणिक प्रभू, श्री गाडगे-बाबा, उपासनी बाबा, केडगावचे श्रीनारायण महाराज, यांचीही थोरवी काही कमी नाही. परंतु ज्यांना 'संत चुडामणि' हे नामाभिधान देता येईल असे शिरडीचे श्रीसाईबाबा हेच होत. हे अंदाजे १८५८ मधे शिरडीस प्रगट झाले व १९१८ चे विजयादशमीस त्यांनी अवतार समाप्ती घेतली. समाधिस्थ होऊन श्रीबाबांना आता ६२ वर्षे झाली आहेत. संतांच्या सहवासात राहून स्वतःचा

उद्धार करून घ्या ते जर जमले नाही तर त्यांचे निदान नामस्मरण करा असे स्मृतीवचन आहे. तेव्हा श्रीबाबांचा प्रत्यक्ष सहवास जरी आपल्याला लाभत नसला तरी त्यांचे नामस्मरण मात्र प्रत्येकाने अवश्य करावे. श्रीबाबांच्या ६० व्या महानिर्वाणा निमित्य आम्ही तेव्हा एक सुंदर निबंध स्पर्धा आयोजित केली होती त्या स्पर्धेत फार थोड्या लेखक भक्तांनी भाग घेतला. चार पुरस्कार देऊन उरलेले पण वाचनीय असे काही निबंध आमच्यापाशी होते त्या सर्वांचा एक अंक काढावा अशी मागणी फेब्रुवारीमध्ये भरलेल्या संमेलनात झाली व त्याला अनुसरूनच हा 'श्रीसाईबाबा निबंध विशेषांक' म्हणून वाचकांच्या भेटीस येत आहे. या अंकातील श्रीबाबांच्या बद्दलची विविध माहिती अनेक भक्तांना कुठेही, वेळोवेळी उपयुक्त ठरणारीच अशी आहे. वाचक नेहमीप्रमाणे या अंकाचे स्वागत करतील अशी खात्री बाळगतो.

# धन्य ते शिर्डी क्षेत्र

धन्य ! धन्य ते शिर्डी क्षेत्र<br>
भक्त साई गुणाचे गाती गीत ॥ धृ० ॥

उदीरूपी देवूनी नूर<br>
अज्ञान दुःख होई दूर<br>
ठेवा ! ठेवा श्रद्धा अपार<br>
होईल अडचणीचा बेडा पार ॥ १ ॥

श्रद्धे विना कैचि प्रचिती<br>
प्रचिती विना कैचि भक्ति<br>
घ्या ! घ्या एकदा अनुभूती<br>
चमत्काराने होईल कुंठित मती ॥ २ ॥

ऐसा प्रभाव सच्चिदानंद साईनाथांचा<br>
कली युगाच्या या थोर अनंताचा<br>
नका ! नका ! करू उशीर<br>
दर्शन घेण्या सद्‌गुरु साईनाथांचे ॥ ३ ॥

—श्री. रामचंद्र कृष्णा पोकळे<br>
जयराम उपाध्याय चाळ खो. नंबर १<br>
वायशेत पाडा नं. १ कुरार व्हिलेज<br>
मालाड पूर्व, मुंबई ६४

# श्रीसाई–एक अवतार

—श्री. गंगाधर रामचंद्र भट
संदेश हौसिंग सोसायटी,
सामंतवाडी सोनावाला रोड,
गोरेगाव पूर्व, मुंबई ६३.

●श्रीसाईबाबांचे समग्र चरित्र कथन करणे किंवा त्यांनी केलेल्या अगणित चमत्कारांची उजळणी करणे हा या लेखाचा हेतू नाही.

*कृष्ण स्वये जो परमात्मा। तोही म्हणे संत महात्मा। संत माझी सजिव प्रतिमा। संत सप्रेमा तो मीच। प्रतिमा रुपही संता न साजे। संत निश्चळ स्वरूप माझे। म्हणवुनि मद्भक्तांचे ओझे। तयांचे लाजे मी वाहे॥ संतासी जो अनन्य शरण। मी ही वंदी तयाचे चरण। ऐसे वदला उध्दवा आपण। संत महिमान श्रीकृष्ण॥ (श्रीसाई सच्चरित)

म्हणून संत हे परमेश्वराचे अवतारच होत या विषयी संदेह नसावा. संतांचे अवतारकार्य काय आहे, मानवी जीवनात संतांचे स्थान काय आहे वगैरे दृष्टीकोनातून श्रीसाईबाबांच्या अवतारकार्याचा विचार केला आहे.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥
यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम्॥

(गीता–ज्ञानकर्म संन्यासयोग)

भगवंताने अर्जुनाला सांगितले की हे पार्था, साधूंचे रक्षण करण्यासाठी दुष्टांचा नाश करण्यासाठी व ज्या ज्या वेळी धर्माचा ऱ्हास होऊन अधर्म माजतो त्या त्या वेळी युगायुगात मी जन्म घेतो अवतार घेतो.

वरील तऱ्हेचे कार्य करण्यासाठी परमेश्वराने निरनिराळी रूपे घेऊन दहा अवतार घेतले. हे पूर्णावतार होत. परमेश्वराने प्रत्येक अवतारात महाप्रचंड कार्य केले. त्याची बरोबरी करणे मानवी शक्तीच्या पलीकडे आहे.

तथापि, संतज्ञानेश्वर, रामदास, एकनाथ, तुकाराम, अक्कलकोटचे स्वामी, माणिकप्रभू गजानन महाराज श्रीसाईबाबा वगैरे सर्व संतांना आपण अवतारी पुरुष

मानतो. त्याचे कारण काय? त्याचे कारण असे की त्यांच्या ठायी वसत असलेल्या लोकोत्तर गुणांचा सामर्थ्याचा उपयोग त्यांनी आजन्म निष्काम बुद्धीने परोपकारार्थ केला.

हे अखिल चराचर विश्व परमेश्वरानी आपल्या एका अंशाने व्यापले आहे. अंश म्हणजे पूर्णांक नव्हे. पूर्णांक आहे तो एक परमेश्वर. अंश पूर्णांकाची बरोबरी करू शकणार नाही. पण हा अंशच इतका अनंत आहे की त्याचेही पूर्णांशाने आकलन होऊ शकत नाही. पण त्याचे ज्ञान, त्याचे आकलन फक्त संतांनाच असते. इतराना 'नेति नेति' असेच म्हणण्याची पाळी येते.

आपण कलीयुगात आहोत. परमेश्वर काही दरवर्षी अवतार घेत नाही पण या पृथ्वीतलावर पाप पुण्याचा समतोल राखण्यासाठी, परमेश्वराच्या अधिष्ठानाचा विसर पडू नये म्हणून परमेश्वराच्या अंशरुपाने काही असामान्य व्यक्ती जन्माला येतात व आपल्या कृतीने परमेश्वराचे हे उद्दीष्ट साध्य करण्यास मदत करतात. त्यानाच आपण संत म्हणतो, सद्गुरु म्हणतो, अवतारी समजतो.

माणूस विज्ञानात जसजशी प्रगती करीत आहे त्या त्या प्रमाणात माणसातील माणुसकीचा अंश कमी कमी होत चालला आहे. माणूस मनाने व शरीराने दुबळा झाला आहे. माणूस स्वतःवरील विश्वास व मानसिक स्वास्थ्य गमावून बसला आहे. सगळीकडे दुःखाचे रांजण काठोकाठ भरलेले दिसत आहेत. माणूस अगदी भांबावून गेला आहे. अशा वेळी हे बिघडलेले समाजस्वास्थ्य फक्त संतच पूर्व पदावर आणू शकतात. समाजाला माणुसकीच्या मार्गावर आणून एक निराळे श्रद्धास्थान निर्माण करतात. मग माणूस सर्वार्थाने शरण जाऊन संतपदी विश्वासाने डोके ठेवतो व काहीतरी हरवलेले गवसल्याच्या आनंदात समाधानाने परततो.

आता इथे पण एक धोका संभवतो, व तो पुष्कळांच्या वाट्यास येतो. दुसऱ्याच्या दुर्बलतेने पेटलेल्या अग्नीवर स्वतःच्या स्वार्थाच्या पोळया भाजून घेणारे समाजकंटक किंवा साधुत्वाचा आव आणून भोंदुगिरी करणारे पण काही थोडे थोडके नाहीत.

एखादा रोग ग्रस्त माणूस लवकर रोग मुक्त होण्यासाठी जसा कुणाकडेही औषधासाठी धाव घेतो किंवा एखादा कर्जबाजारी माणूस पटकन श्रीमंत होण्याच्या आशेने जुगाराच्या मागे लागतो त्याचप्रमाणे संसारात अनेक अडचणीनी दुःखानी, व्याधीनी गांजलेली माणसे सर्व आपत्तीतून स्वतःची लवकर सुटका करून घेण्यासाठी कुणाचेही पाय धरतात. मग ते पाय साधूचे असोत की भोंदूचे असोत.

कधी स्वतःच्या कुकर्माने तर कधी दुर्दैवाने परिस्थितीचे तडाखे, रट्टे पाठीत एकसारखे बसू लागले की माणूस घायाळ होतो, व्याकूळ होतो, भांबावून जातो.

'करायला गेलो काय आणि झाले काय ? आता कुणाचे पाय धरू ? कोण मला जवळ करील ?' अशी त्याच्या मनाची अवस्था होते. आजुबाजूची माणसे त्याचा तिरस्कार करतात. त्याची सर्वत्र अवहेलना होत असते. जीवन असह्य होते. म्हणून जे असे गांजलेले आहेत, दुःखी आहेत. पीडीत आहेत अवमानीत आहेत अशा सर्वांना असे एखादे आश्रयस्थान हवे असते की जिथे जीवाला विसावा मिळेल, जिथे पाठीवर मायेचा हात फिरेल. जिथे विश्वासाने दुःख उघडे करता येईल. जिथे कुणी तिरस्कार करणार नाही, कुणी उपहास करणार नाही, जिथे कुणी मज्जाव करणार नाही, जिथे मनसोक्त रडता येईल व जिथे धीराचे मायेचे सांत्वनाचे चार शब्द कानी पडतील. अशा लोकांचे संत हे एकच आश्रयस्थान असते. अशा लोकाना धीर देऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे. त्यांचे नैराश्य व वैफल्य नाहीसे करणे, आशिर्वाद देऊन, निरनिराळे दाखले देऊन गोड शब्दानी त्यांचे दुःख हलके करणे किंवा ते सहन करण्याची त्यांच्यात शक्ती निर्माण करणे व भक्ती मार्गाचा अमोल ठेवा त्यांच्या हवाली करून एक श्रद्धास्थान निर्माण करणे. संतांनी आपल्या अधिकारवाणीने सांगितलेले बोधामृत एक नवीन चैतन्य निर्माण करते. 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा.' श्रीसाईबाबांनी जन्मभर हेच कार्य केले. 'जयास न कोणी मालुक वाली। तया सांभाळी साई माऊली। सडली पडली आणि कावली। ती विसावली मशिदीत॥' (श्रीसाईचरित्र) आणि हेच खरे संतांचे अवतारकार्य आहे.

वरील तऱ्हेचे कार्य करीत असताना केव्हा केव्हा संतांच्या ठिकाणी वसत असलेल्या दैवी सामर्थ्याने त्यांच्या हातून कुणाच्या तरी कल्याणासाठी किंवा दुःख निवारणार्थ मानवी बुद्धीला असंभाव्य वाटणाऱ्या गोष्टी अगदी अभावितपणे घडून येतात त्यानाच आपण चमत्कार म्हणतो. पण आपण काही चमत्कार करून दाखविला. आपल्याला कोणताही चमत्कार करून दाखविण्याची सिद्धी प्राप्त झाली आहे व त्या जोरावर आपण काहीही करू शकू असा अहंकार, अशी फुशारकी किंवा अशी बढाई त्यांच्या ठायी कधीही निर्माण झाली नाही. श्रीसाईबाबांनी आपल्या हयातीत स्वतः इतके चमत्कार केले पण ते मात्र नेहमी म्हणत, 'मी ना देव ना ईश्वर। मी ना अंनल हक्क ना परमेश्वर। 'यादे हक्क' मी यादगार। बंदा मी लाचार अल्लाचा॥ कर्ता करविता तो परमेश्वर आहे. केवळ एकसारखे उठसूट चमत्कार करीत रहाणे एवढेच काही संतांचे जीवीत कार्य नव्हे. भक्ती मार्गाचा प्रसार करून हळुहळू परमार्थाचा मार्ग दाखविणे, 'जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव' मानवाला निर्भय करून त्याला कर्तव्याच्या मार्गावर आणण्याचे महान कार्य संतांनी केले आहे.

शैले शैले न माणिक्यं, मौक्तिकं न गजे गजे
साधवो न ही सर्वत्र, चंदनं न वने वने ।।

साधुसंत काय वाटेवर पडले आहेत? साधुसंत काय पायलीचे पन्नास असतात? हिऱ्यासारखे चकाकणारे, हिऱ्याचा आभास उत्पन्न करणारे नकली खडे पुष्कळ असतात. पण खरा हिरा फार दुर्मिळ असतो. त्याचप्रमाणे साधुत्वाचा आभास उत्पन्न करणारे भोंदू कितीतरी असतात पण खरा संत खरा साधू क्वचितच आढळतो. पूर्व सुकृता शिवाय खऱ्या संताचे दर्शन घडत नाही. पूर्व संचिता शिवाय संतसमागम लाभत नाही. भगवत्कृपेविना संत भेटीची लालसा उत्पन्न होत नाही. ही लालसा तळमळीचे रुप धारण करते व ज्यावेळी तळमळ शिगेला पोहोचते तेव्हाच संताची भेट होते, दर्शन होते. 'जेव्हा बहु जन्म संपादित। प्राक्तन कर्म उदया येत। तेव्हाच संत समागम लाभत। मोह जनित तम नासे।। (श्रीसाईचरित्र)

श्रीसाईबाबा एखाद्या दीप स्तंभाप्रमाणे अचल उभे राहिले. त्रिविध तापे पोहलेल्या भवसागरात गटांगळया खाणाऱ्या असंख्य दुर्बल पीडीताना गांजलेल्याना त्यांनी भक्तीमार्गाच्या होडीत बसवून त्यांच्या हाती श्रद्धा व सबुरी ही दोन वल्ही दिली व सांगितले. 'सदैव माझ्याकडे दीपस्तंभाकडे–लक्ष ठेवून ही वल्ही मारीत होडी हाकारा व पैल तीरास जा. मी तुमच्या पाठीशी सदैव उभा आहे. मी तुमचे रक्षण करीन. ही माझी मशीद माई तुम्हाला दुःख मुक्त करील. एवढेच काय पण माझ्या मागे माझी तुर्बत तुमच्या हाकेला धावून येईल. तुम्हाला संकट मुक्त करील.' या आश्वासनाची प्रचिती आजही श्रीसाईबाबांचे लाखो भक्त घेत आहेत.

आता इथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहीजे ती अशी की कुठल्याही संताला परमेश्वराने संजिवनी विद्या दिली नव्हती की कुबेराच्या भांडाराच्या किल्ल्या दिल्या नव्हत्या.

'जातस्यहि ध्रुवो मृत्युः ध्रुवं जन्म मृतस्यच' जन्मापासून सुरु झालेल्या प्रवासाचे दुसरे टोक म्हणजे मृत्यू. पण हे दुसरे टोक गाठी पर्यंत नाना आपत्तीनी संकटानी आधिव्याधीनी माणूस त्रस्त होतो. भयभीत होतो. अशा माणसाना भीतिमुक्त करण्याचे कार्य संतांनी श्रीसाईबाबांनी केले. अशा संताच्या ठायी जर आपली अनन्यश्रद्धा असेल, अविचलीत श्रद्धा असेल. विश्वास असेल निष्ठा असेल तर जन्म मरणाच्या फेऱ्यातून मुक्तता करणारा खरा मायबाप तोच आहे ही आपली खात्री पटेल. अशा संताचे उपकार जन्मजन्मांतरी फिटणार नाहीत. कृतज्ञतापूर्वक अनन्यश्रद्धेने केलेला एक नमस्कार एवढी एकच गुरुदक्षिणा त्यांना प्रसन्न करते. असा हा नमस्कारच आपल्या आयुष्याची सांगता घडवून आणील सार्थकता घडवून आणील.

पूर्व संचिता प्रमाणे प्रत्येक प्राणी मात्राला सुखदुःखाचे फेरे भोगावेच लागतात. यातून कुणाचीच सुटका नाही. श्रीसाईबाबा सांगतात. ' इष्टा निष्ट सुखदुःख। संचितानुसार अमृत वा विख। हे प्रवाह पतित द्वंद्व देख। धरी न हरिख वा शोक। जे जे येईल ते ते साहे। अल्ला मालिक वाली आहे। सदा तयाच्या चिंतनी राहे। काळजी वाहे तो सारी. ॥

छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, महात्मागांधी यांच्यासारखे युग पुरुष असोत, ज्ञानेश्वर, रामदास, एकनाथ, तुकाराम किंवा श्रीसाईबाबा असोत किंवा प्रभु रामचंद्रासारखे अवतारी पुरुष असोत सर्वांना सुखदुःखाचे फेरे भोगावेच लागले. पण हे संत मात्र स्वतःच्या सुखदुःखाची वाच्यता न करता नेहेमी दुसऱ्यांचे अश्रू पुसण्यास धावतात. दुसऱ्याना धीर देऊन संकट मुक्त करतात. श्रीसाईबाबांनी तर दुसऱ्याना रोग मुक्त करण्यासाठी संकट मुक्त करण्यासाठी स्वतः क्लेश भोगले. भट्टीमध्ये पडणाऱ्या लोहाराच्या मुलीला वाचविण्यासाठी समोर पेटलेल्या धुनीत स्वतःचा हात भाजून घेतला. दुसऱ्याचा ग्रंथीज्वर बरा करण्यासाठी स्वतःच्या कमरेवर ग्रंथी उठवून घेतल्या. श्रीसाईबाबांना मनोभावे शरण गेलेल्या माणसाला मनोमन खात्री असते विश्वास असतो की माझे श्रीसाईबाबा रक्षण करतील व केवळ या विश्वासाच्या जोरावर तो कुठल्याही संकटाला धीराने सामोरा जातो. तो नैराश्याने ग्रासला जात नाही.

श्रीसाईबाबांनी भक्तसंकट निवारणार्थ अगणित चमत्कार केले. इतकेच नव्हे तर तसे चमत्कार अजून घडून येत आहेत. बिब्याचे गोळे चिणून कुणाचे डोळे साफ बरे केले, अक्रोड पिस्ते बदाम खायला सांगून एकाची पटकी बरी केली, ' काळ्या कुत्र्याला दहीभात खायला घाल ' असे सांगून एकाचा हिवताप बरा केला. भुई-मुगाच्या शेंगा खायला देऊन कुणाचे जुलाब बंद केले. आता अशा तऱ्हेचे उपचार कुठल्या वैद्यशास्त्रातले आहेत असा प्रश्न पडतो. पण इथे संपूर्ण विश्वास हेच एक शास्त्र आहे व शस्त्र आहे. उदी लावून हाड्याव्रण बरा केला. उदीने कुणाचा ग्रंथीज्वर बरा केला, उदीने कुणाचे नारु बरे केले, कुणाचा मुतखडा बरा केला, कुणाचा कफक्षय गेला, कुणाचा कर्ण रोग गेला, कुणाचा पोटशूळ गेला, तर कुणाला त्यांनी दिलेल्या आशिर्वादाने संतती प्राप्त झाली. संकटात सापडलेल्या भक्ताच्या हाकेला ते त्वरीत धावून जात व जातात. तो भक्त मग कुठेही असो, कितीही दूर असो. आपल्या भक्तांच्या एकूणएक हालचालीची त्यांना पूर्ण खबर असे व त्यामुळे त्यांच्या जवळ खोटे बोलण्याची मुळीच सोय नव्हती. भक्तांच्या भावी संकटाची सूचना देत त्यांना जागे करीत व योग्य तो सल्ला देऊन त्यांचे संभाव्य संकट दूर करीत. श्रीसाईबाबांनी हयातभर आपल्या भक्तांची काळजी वाहीली. अजून वाहात आहेत. ते केवळ आपल्या

भक्तासाठीच जगले व चंदना प्रमाणे स्वतः झिजून भक्तांच्या जीवनात आनंदाचा परिमल, सुगंध पसरविला तर मनात भक्तीचे मळे फुलविले, इतर संताप्रमाणे लौकिक दृष्ट्या त्यांचा अवतार समाप्त झाला असला तरी त्यांचे अवतार कार्य अव्याहतपणे अजून चालूच आहे. हाच त्यांच्या श्रेष्ठत्वाचा पुरावा होय.

श्रीसाईबाबा आपल्या भक्तांना आश्वासन देतात की 'आकंठ संकटार्णवी बुडाला। होका महद्दुःख गर्तेत गढला। जो या मशिद माईची पायरी चढला। सुखा आरूढला तो जाणा॥ फकीर येथीचा मोठा दयाळू। करील व्यथेचे निर्मळु। प्रेमे करिल प्रतिपाळू। तो कनवाळु सकळांचा॥ तुम्ही कोणी कुठेही असा। भावे मजपुढे पसरिता पसा। मी तुमचिया भावासरिसा। रात्रं दिसा उभाच॥ तू मजकडे अनन्य पाही। पाहीन तुजकडे तैसाच मी ही। माझ्या गुरूने अन्य काही। शिकविले नाहीच मजलागी॥

अशी ही माझी साई माऊली. जिथे ही मूर्ती अवतरली धन्य ती शिर्डी, धन्य ती भूमी धन्य ते तरू, धन्य ते पाषाण, धन्य ती शिरडीची चराचर सृष्टी. सर्व सर्व काही श्रीसाईच्या वास्तव्याने पावन होऊन गेले. पवित्र झाले. जिथे अहोरात्र दुथडी वाहू लागलेल्या भक्तीच्या भागीरथीत अवगाहन करण्यासाठी लाखो लोक शिर्डीचा आश्रयाला दर्शनाला दररोज येत असतात, व समाधानाने. काहीतरी हरवलेले गवसल्याच्या आनंदाने घरी परततात. माहेरच्या ओढीने येतात व सासरच्या कर्तव्यासाठी श्रीसाईबाबांचा आशिर्वाद घेऊन जड अंतःकरणाने परततात.

'समोऽहं सर्वभूतेषु' या भगवंताच्या वचनाप्रमाणे श्रीसाईबाबांकडे सान थोर राव रंक असा भेदभाव नव्हता. तिथे सर्वांना एकच माप होते. 'पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति। तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः। श्रीसाईबाबांनी पण भक्तीभावाने दिलेला उष्टा पेढा असो, वाल पापडीच्या शेंगा असोत. खिचडी असो की वांग्याचे भरीत असो सर्व काही मोठ्या आवडीने खाल्ले.

श्रीसाईबाबांचे आचरण, त्यांची दिनचर्या. त्यांचा उपदेश. त्यांची खेडवळ राहाणी व खेडवळ वाणी सर्व काही मानवतेचा उदात्त व भव्य आदर्श होता. एक दिव्य संदेश होता.

संसारात त्रस्त झालेला, अहोरात्र विवंचनेच्या चिंतेच्या छायेत वावरणारा सामान्य माणूस स्वतःच्या परिस्थितीच्या विचाराने इतका गांजलेला असतो की त्याला इतर गोष्टींचा विचार करण्यास सवडच नसते, ब्रम्ह, माया, ज्ञान, चारीमुक्ती, मुमुक्षु, साधक, सिद्ध, बध्द, मुक्त, द्वैत अद्वैत वगैरे गोष्टी त्या बिचाऱ्याच्या आकलन शक्तीच्या पलीकडील आहेत. अशा गोष्टींचे त्याला आकर्षण नसते. म्हणूनच श्रीसाई-

बाबांनी आपल्या भक्तांना कुठलीही कठोर उपासना किंवा उपास-तापास करावयास सांगितले नाही. त्यांचा उपदेश अगदी साधा व सरळ होता. 'माझी भक्ती करा. स्मरण करा. माझ्यावर विश्वास ठेवा. श्रध्दा ठेवा. सबुरी धरा. तुमचे रक्षण करण्यांसाठी मी तुमच्या पाठीशी सदैव उभा आहे. कुणाचे श्रम फुकट घेऊ नका. कुणाची निंदा करू नका. भुकेलेल्याला भाकर द्या. सत्याचरण करा. जसे कर्म कराल तसे फळ मिळेल. मी फक्त तुमच्या प्रेमाचा भक्तीचा भुकेला आहे. मला दुसरे काही नको. षोडषोपचार पूजा नको, मेवामिठाई नको, धनदौलत नको.'

जे त्रैलोकी नाही दान। ते करिती संत सज्जन। तया संतांचे महिमान। काय म्हणोनि वर्णावे। जे त्रैलोक्याहुनी वेगळे। जे वेद श्रुतीसी नाकळे। ते चि जयाचे नि बोळे। परब्रम्ह अंतरी॥ ऐसी संतांची महिमा। बोलि जे तितुकी उणी उपमा। जयाचे नि मुख्य परमात्मा। प्रकट होये॥ (दासबोध १–६) श्रीसमर्थ रामदासांनी संतांचे केलेले वरील वर्णन श्रीसाईबाबांना तंतोतंत लागू पडते. 'जयाचे नि मुख्य परमात्मा। प्रकट होये' याची प्रचिती त्यांनी आपल्या भक्तांना दाखविली. दासगणूना विठ्ठलाचे दर्शन झाले. भजनी मेळयातील एका मद्रासीबाईला श्रीरामाचे दर्शन झाले, तिच्याच पतीला रामदासांचे दर्शन झाले तर एका रामोपासक डॉक्टरला प्रभुरामचंद्राचे दर्शन झाले. श्रीसाईबाबांचा केवढा अधिकार होता! त्यांचे शब्द त्यांचा आशिर्वाद परमेश्वराला खरा करून दाखवावा लागे. 'रेखेवरी मारी मेख' असे त्यांचे शब्द असत. त्यांच्याकडे गेलेला नास्तिकही अस्तिक होऊन त्यांना शरण जात असे.

ऋषीचे कूळ व नदीचे मूळ शोधू नये असे म्हणतात. कारण कूळ किंवा मूळ याला महत्त्व नसते. ऋषीचे तेज व नदीचे पाणी महत्त्वाचे असते. श्रीसाईबाबांचे शके १७८० ते शके १८४० पर्यंत साठ वर्षे शिर्डीत वास्तव्य होते. एका पडक्या मशिदीत राहत. पण त्यांचा धर्म कोणता होता. त्यांचे मातापिता कोण होते. त्यांचा मूळगाव कोणता याचा शेवटपर्यंत कुणालाही पत्ता लागला नाही. आरंभी एक फकीर म्हणून लोक त्यांच्याकडे पाहात. गावात भिक्षा मागून मिळेल त्यावर निर्वाह करीत. पण हळुहळू त्यांची महिती व सामर्थ्य लोकांच्या प्रत्ययास येऊ लागले. श्रीसाईबाबांनी केलेला औषधोपचार. त्यांनी दिलेला उदी प्रसाद व आशिर्वाद हे फार प्रभावी व गुणकारी ठरू लागले, व हा वेडगळ दिसणारा फकीर साधासुधा नसून एक महान अवलिया आहे अशी लोकांची खात्री पटली. त्यांच्या दिव्यत्त्वाचा परिमल कर्णोपकर्णी दूरवर पसरू लागला व त्यांच्या दर्शनासाठी पुष्कळ शिर्डीस येऊ लागले. मोठमोठे विद्वान, मोठमोठे सरकारी अधिकारी, जमीनदार, शास्त्री, पंडित, गरीब पीडित दुःखित ब्राम्हणापासून

तो शूद्रापर्यंत सर्व थराचे, सर्व धर्मांचे लोक प्रभावित झाले. त्यांची भक्ती करू लागले, आणि हे सर्व केव्हा घडले ? तर साठसत्तर वर्षापूर्वी की ज्या काळात लोक अत्यंत कर्मठ होते.

ज्ञानेश्वर, रामदास, एकनाथ, तुकाराम, श्रीसाईबाबा, गजानन महाराज वगैरे जे परमेश्वराचे संतावतार जेव्हा जेव्हा झाले त्या त्या वेळी सर्व साधारणपणे राजकीय परिस्थिती अस्थीर होती. धार्मिक व सामाजिक घडी विघडून गेली होती, 'किं कर्म किम कर्मे ति कवयोप्यत्र मोहिताः' काय करावे वा काय करू नये याची भल्या भल्याना भ्रांत पडली होती. अशा वेळी या सर्व संतानी भक्ती मार्गाचा नंदादीप उजळून त्याच्या प्रकाशाने सर्व भांबावून गेलेल्या समाजाला सावरून धरले लोकांचे नैराश्य दूर करून त्यांना धीर दिला. त्यांच्या जीवनात निर्माण झालेला अंधार नाहीसा करून त्यांना त्यांचा हरवलेला नाहीसा झालेला आत्मविश्वास परत मिळवून दिला व त्यांना भयमुक्त केले.

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात् परब्रम्ह तस्मै श्रीगुरवेनमः॥

जो साक्षात् परब्रम्हाच्या रुपाने अवतीर्ण झालेला आहे, अशा सद्गुरुच्या श्रीसाईबाबांच्या रूपाचे वा गुणांचे संपूर्ण आकलन होणे किंवा त्यांचे संपूर्ण कथन करणे मानवी शक्ती पलीकडील आहे. त्याचे कितीही कथन केले वाचन केले किंवा श्रवण केले तरी कधीही तृप्तीची ढेकर येत नाही, अपूर्णच वाटते. अजून काहीतरी बाकी आहे, शिल्लक आहे ही भावना ही जाणीव मनाला सतत टोचत राहाते. श्रीसाईबाबांच्या चरित्राच्या ९४५० ओव्या लिहून सुद्धा कवी हेमाडपंतांचे (थोर साई-भक्त कै. रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर) समाधान झाले नाही. विस्तार भयास्तव संक्षिप्तपणे कथन केल्याची कबुली दिली आहे. मग त्याच चरित्रावील वेचलेल्या या चार थेंबानी कुठल्या चातकाचे—वाचकाचे समाधान होईल ?

मनाच्या तंद्रीला पूर्ण पदावर आणणे भागच आहे, आणि म्हणून, 'प्राणि मात्र राहो सुखी। नसो कोणी रोगी दुःखी। देह पडो हा सुखा सुखी। नाम मुखी तव घेता घेता' अशी सद्गुरु श्रीसाईबाबांच्या चरणी मनःपूर्वक प्रार्थना करून श्रीसाई-बाबांच्या गुणकीर्तनात डुंबत राहाण्याची सवय लागलेल्या चटक लागलेल्या या लेखणीला आता इथे आवर घालतो. । शुभंभवतु ।

# माझी साईभक्ती

—श्री. एन. जी. परुळेकर
केदार, प्लॉट नं. १७३,
अभिनव नगर, बोरीवली.

● साईभक्ती शब्दांकित करणही तस पाहता अशक्य गोष्ट आहे. भक्ती ही एक मनाची परिणत अशी आनंदमय अवस्था आहे. त्या अवस्थेचा आनंद फक्त उपभोगता येतो. तो शब्दात व्यक्त करता येत नाही. भक्तीचे वर्णन करू गेल्यास ती विभक्ती होते.

बालपणापासूनच आध्यात्मिक गूढगुंजनांकडे माझ्या मनाची ओढ सातत्याने आहे. मात्र वयोमानाप्रमाणे माझ्या विचारांची बैठक ज्ञानप्रधान होत गेल्यामुळे चमत्काराला नमस्कार माझ्याकडून सहजासहजी केला जात नाही. संत सहवास मला लहानपणापासूनच घडत गेला आहे. माझ्या बालवयात आमच्या गावी एक मौनिबुवा म्हणून संत आले होते. ते कित्येक वस्तू हवेतून निर्माण करून दर्शनार्थी लोकांना प्रसाद म्हणून देत. मला त्याचं मोठ आश्चर्य वाटत असे. मात्र एवढ असूनही घरातील अक्कलकोट स्वामींच्या तसबिरीकडे माझ मन जेवढी ओढ घेत असे तेवढी ओढ मौनिबुवांकडे, त्यांनी करून दाखविलेले चमत्कार पाहूनही घेईना. वस्तुतः त्या वयात अक्कलकोटच्या स्वामींबद्दलचे माझे ज्ञान त्यांच्या तसबिरीपुरतेच मर्यादित होते. तरीही त्या तसबिरीतील चेहऱ्यावर दृष्टी पडली की माझे हात आपोआप जोडले जात. स्वामींच्या चेहऱ्यावर मला एक प्रकारचा दिव्यत्वाचा साक्षात्कार अगदी त्या वयातही होत असे. माझ्या मते हेच अवतारी संत पुरुषांचे वैशिष्ट्य आहे. एका दृष्टीक्षेपातच ते आत्मस्वरूपाची प्रचिती सामान्य माणसालाही करून देतात.

हळू हळू माझा संत-सहवास वाढत गेला; आणि मला जाणीव होऊ लागली की संत हे ईश्वरी संकल्पानेच अवतीर्ण होत असतात. स्थलकालानुरूप परमेश्वरच निरनिराळया संत-रूपानी वेगवेगळया कारणास्तव अवतीर्ण होत असतो. संतामध्येच ईश्वराला पाहण्याच्या माझ्या या मानसीक कलामुळे दिव्यत्वाची प्रचिती आलेल्या सर्व संतांकडे माझ्या मनाची ओढ सारखीच राहिली. शिर्डीला न जाताही मी साईबाबांचा भक्त होतो. शिर्डीला जाण्याचा योग काही केल्या कित्येक वर्षे जुळून येत नव्हता. काही वर्षे गेली, आणि एके दिवशी अचानक कुर्ल्याचे महान साईभक्त डॉ. गवाणकर यांच्या कृपाप्रसादाने पहिल्यांदाच कोजागिरी पौर्णिमेला माझी शिर्डी

भेट अगदी आयत्यावेळी घडून आली. त्यानंतर मी साईलीला मासिकाचा वर्गणीदार झालो. ते मासिक दर महिन्याला वाचून माझ्या आध्यात्मिक ज्ञानात आणखी भर पडली. मात्र एक गोष्ट मला नीट आकलन होत नाही ती एवढीच की केवळ साई-बाबांनी केलेल्या तथाकथित चमत्कारामुळे साईबाबांच्या दर्शनार्थी लोकांमध्ये साई-भक्ती कशी निर्माण होऊ शकते. साईभक्तांना आलेले चमत्कारांचे अनेक अनुभव साईलीलेच्या अंकातून वाचायला मिळतात. भक्तांनी फक्त अशा घटनांनाच चमत्कार का म्हणावे हे पण मला कळत नाही. तसं पाहता परमात्मस्वरूपावर भासमान होणारं हे संपूर्ण जगच मुळी एक महान ईश्वरी चमत्कार मानावा लागेल. फार काय, आपल्या जीवनातील अगदी रोजची साधी गोष्ट घ्या. रोज रात्री आपण झोपतो. दुसऱ्या दिवशी ठराविक वेळी आपण आपोआप जागे होऊन उठतो हा लहानसान चमत्कार आहे का ? झोपेतून आपणाला कोण उठवतं ? परमेश्वराच्या या महान चमत्कारा-बद्दल आपण कधीतरी विचार करतो काय ? करीत नाही, कारण तो चमत्कार व्याव-हाराच्या चौकटीत बसत नाही. व्यवहारी भक्तीचा फक्त व्यवहारी चमत्कारच भासमान होतात. आणि अशा व्यवहारी भक्तीमागे निर्भेळ आध्यात्म नसून व्यवहारी अपेक्षा असतात. कुर्ल्याच्या डॉ. गवाणकरांप्रमाणेच धुळयाला श्री. अ. ल. भागवत म्हणून एक वयोवृद्ध प्रापंचिक संतपुरुष आहेत. आध्यात्मावर त्यांनी बरीच ग्रंथनिर्मिती केली आहे. आपल्या एका पुस्तकात त्यांनी अशाच व्यवहारी साई भक्तीचा वानगी-दाखल उल्लेख केला आहे. तो वाचून आपणाला आपल्याही साई भक्तीचे परीक्षण करता येण्यासारखे आहे. म्हणून त्यांचे शब्द मी खाली उधृत करीत आहे :

"एकदा नगरहून शिर्डीला चाललो होतो. गाडीत बेताचीच गर्दी होती. माझ्यासमोर एक पोक्त जोडपे बसले होते. बाई मोठ्या कुलशीलवान व देखण्या होत्या यजमानांचा पोषाख, पायजमा, शर्ट व त्यावर हिरवा स्वेटर असा होता. त्यांनी डोक्याला मफलर गुंडाळला होता. गृहस्थ जरा आजारी असावेत असे त्यांच्या चेहऱ्यावरून वाटले. त्या बाईंच्या व तिच्या पतिराजांच्या गळयात साईबाबांचे लॉकेट होते. दर पाच मिनिटानी ते दोघेजण त्या लॉकेटला हात लावून नमस्कार करीत. त्या गृहस्थांजवळ साईबाबांचा एक कार्ड साईज फोटो होता. तो अधून मधून खिशातून काढून कपाळाला लावीत. त्यांची पत्नी पुडीतून विभूती काढून यजमा-नांच्या कपाळी लावी. असे शेवटपर्यंत चालले होते. मी सहज चौकशी केली. ते गृहस्थ पुणे येथे एका प्रसिद्ध कॉलेजात जीवशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांना चार पाच महिन्यापूर्वी हृदय विकाराचा झटका आला होता. त्यामुळे ते फार धास्तावले होते. उत्तम नोकरी, सुशील पत्नी व मुले असून हा गृहस्थ अत्यंत दुःखी झाला होता. कोणत्या क्षणाला मृत्यू येईल हे सांगता येत नसल्यामुळे ते फार घाबरलेले दिसत होते.

आपण या व्याधीतून मुक्त व्हावे या हेतूने त्यांनी ही साईभक्ती सुरू केली होती. ईश्वराचा देह व त्याची काळजी करणारे ते गृहस्थ असा हा चमत्कार होता. मनामध्ये ईश्वराविषयी निर्व्याज प्रेम नव्हते. रोग बरा होण्याची मागणी होती. शिर्डीला आल्यावर त्यांनी साईबाबांना अभिषेक केला. ते बसत त्या दगडाला डोके टेकविले व इतर सर्व सोपस्कार केले. डालडा डबाभर विभूती त्यांनी पैदा केली. तोंडाने सारखे ' साईनाथ ' असे नामस्मरण चाले. माझ्या मामांची ( हेही त्या कॉलेजमध्ये प्राध्यापक होते ) व त्यांची चांगलीच ओळख होती. दोन चार महिन्यानी मी पुण्यास मामांच्याकडे गेलो तेव्हा त्यांना सहज त्या साईभक्ताबाबत विचारले. ' अरे ते तर दोन महिन्यापूर्वीच हार्ट अटॅकने वारले ' असे मला मामांनी सांगितले.

साईबाबांनी त्यांची प्रार्थना ऐकली नाही. ज्या प्रारब्ध कर्मानुसार देह उत्पन्न झाला आहे त्या कर्मांची फळे भोगल्याशिवाय त्या देहाला गत्यंतर नाही. अतुल भक्तीयोगात जीव ईश्वराशी एकरूप झाल्यामुळे कृतकर्मांची इष्टानिष्ट फळे भोगणाराच शिल्लक राहात नाही. खऱ्या भक्तीची हीच मोठी किमया आहे. परत परत सांगतो, बाबांनो ईश्वराच्या देहाचा सांभाळ तुम्ही कोण करणार ? त्याला सौख्य प्राप्त करून देण्याचा तुम्हास काय अधिकार ? ईश्वराशी एकरूप होऊन तुम्ही या भवसागरातून बाहेर निघा. असे केलेत म्हणजे संसार म्हणून काही स्थितीच नसून सर्वत्र सत् चिद् व आनंद दुमदुमून भरला आहे असा तुम्हास अनुभव देईल. अंति हा अनुभव घेणाराही स्वरूपाशी एकरूप होऊन अनुभवरहीत जाणीव तुम्ही व्हाल. ''

माझ्याही जीवनमार्गावर अनेक चढउतार मी अनुभवले आहेत. फार काय अगदी या क्षणाला सुद्धा माझ्यावर फार मोठी आपत्ती कोसळलेली आहे. डॉ. गवाणकरनाही त्याची कल्पना आहे. हृदयविकाराचा झटका तर एकदा येऊन गेलेलाच आहे. दुसरा केव्हा येईल सांगता येत नाही. हा सर्व कर्मभोग आहे तो भोगण्याची ताकद आध्यात्मिक मार्गानेच मिळू शकते असा माझा अनुभव आहे. आणि यालाच मी परमेश्वराचा किंवा साईबाबांचा म्हणा, कृपाप्रसाद समजतो. संकट निवारण हा जेवढा चमत्कार असू शकेल त्याहून मोठा चमत्कार म्हणजे संकट आनंदाने सहन करण्याची ताकद आपल्याला परमेश्वरी कृपेने प्राप्त होणे हाच होय. पण हा चमत्कार व्यवहारी भक्तींच्या वचनी पडत नाही, म्हणून तो व्यवहारात चमत्कार मानला जात नाही. माझी साईभक्ती ही साईबाबांच्या परमात्म स्वरूपावर केंद्रित झालेली आहे. या स्वरूपावर भासमान होणारे हे विश्व सुद्धा साईबाबामय आहे अशी माझ्या आध्यात्मिक विचारांची ठाम बैठक आहे. संत तुकाराम महाराजांच्या तसबिरीत मला साईबाबा भासमान होतात तसेच गोंदवलेकर महाराजही भासमान होतात. संतांच्या

बाह्यस्वरूपावर मन केंद्रित करणे मला पटत नाही, आणि कुठल्याही सांप्रदायाचा मी अनुयायी नाही. अवतारी संत सांप्रदाय निर्माण करीत नाहीत. साईबाबांनी पण आपला खास असा सांप्रदाय निर्माण केला नाही. सर्वाभूती समभाव हाच त्यांचा वैश्विक सांप्रदाय होय. त्यामुळे तुम्ही कुठल्याही धर्मांचे अनुयायी असा किंवा कुठ-ल्याही अन्य अवतारी संताचे भक्त असा, साईबाबांची कृपादृष्टी तुमच्यावर आहेच हे मी तुम्हाल स्वानुभवावरून सांगू शकतो. यास्तव कुठल्याहीं अन्य अवतारी संत पुरुषांबद्दलची भक्ती ही साई-भक्तीच होय. सर्वाभूती परमेश्वरच आहे. साईभक्ती म्हणजे या विश्वाच्या निर्मात्याचीच भक्ती होय. माझ्या भक्तीयोगात मी साईबाबांच्या परमात्मस्वरूपाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करतो. अशा भक्तीमध्ये तल्लीन झाल्यावर व्यवहारातल्या प्रापंचिक गोष्टींचे मला भानही राहात नाही. सर्वत्र सत् चिद् आनंद दुमदुमून भरला असल्याची जाणींव निर्माण होते. म्हणून व्यवहारी चमत्कारांकडे आकर्षित होणाऱ्या सर्व भक्तांना माझं आग्रहाचं सांगणं आहे की बाबांनो साईकृपेने कुबेराचे कैवल्यमय रत्नभांडार आपणासमोर खुलं असताना आपण लहानसान प्रापंचिक गोष्टींचे साकडे बाबांना न घालता त्यांच्या परमात्मस्वरूपाशी एकरूप होण्याचा प्रयत्न का करू नये! शिर्डीला येताना कोण-ताही हेतू मनात न धरता फक्त परमेश्वराबद्दलच्या निर्व्याज प्रेमाच्या ओढीनेच शिर्डीला येणे हीच खरी साईभक्ती साईमय शिर्डीमध्ये साईबाबांशिवाय आणखी काही नाही. म्हणून सर्वांशी समान साईभाव ठेवणे, आणि थोडा वेळ का होईना, आपणच साईमय होणे हीच माझी साईभक्ती, " शिवो भूत्वा शिवं यजेत् " अशा भक्तीमय अवस्थेमधला परमानंद मी नेहमी अनुभवतो. तो शब्दात वर्णन करणे केवळ अशक्य.

" हेचि दान देगा देवा तुझा विसर न व्हावा
न लगे मुक्ती धन संपदा संत संग देई सदा "

— संत तुकाराम —

" ये यथा मां प्रपद्यंते तांस्त थैव भजाम्यहम् "

— भगवद् गीता —

✥ ✥ ✥

# भक्तभाव व श्रीसाई दर्शन

—श्री. रामचंद्र केशव काळे
१७४ अभ्यंकर नगर, नागपूर

पाहोनिया भक्तभाव । कैसे साई महानुभाव ।
दावीत भक्तास एकेक अनुभव । वाढवित वैभव भक्तिचे ॥ १३९
वाटेल तैसा वेष घेती । मानेल तेथे प्रकट होती ।
भक्त कल्याणार्थ कुठेही फिरती । शिष्य भावार्थी पाहिजे ॥ १४०

वरील दोन ओव्या श्रीसाई सच्चरित्रातील अध्याय ३३ मधील आहेत. वरील दोन ओव्यांचा अनुभव सन १९७४ च्या दसऱ्यातील पारायणाच्या वेळेस आला. गेल्या नऊ वर्षापासून श्रीबाबा दसऱ्याच्या नवरात्रात श्रीसाईसच्चरिताचे पारायण करवून घेत आहेत. पारायण समाप्ती मेहूण घालून व यथाशक्ति दक्षिणा देऊन होते. सन १९७३ च्या पारायण समाप्तीनंतर काही अडचणीमुळे मेहूण घातले गेले नाही. त्यावेळी ब्राह्मण भोजन घालून पारायण समाप्ती केली; व रु. ११|–शिरडीस पाठवू म्हणून म्हटले. याच अर्थाची एक चिठ्ठी लिहून, श्रीसाईसच्चरित्रात श्रीबाबांच्या फोटोजवळ ठेवली, उद्देश हा की आठवण रहावी. पण केवळ विस्मरणामुळे रु. ११ पाठवले गेले नाहीत.

सन १९७४, दसऱ्याच्या नवरात्रात पारायणास सुरवात करण्याचे वेळी, पोथीस नमस्कार केला व कव्हर उघडले, आणि त्यावेळी ती चिठ्ठी नजरेस पडली व मग एकदम हृदयात धस्स् झाले. हृदय अपराधाने भरून आले. परंतु त्याक्षणी काय इलाज होता ? काहीच सुचेना, धड पारायणास मन तयार होत नव्हते. मग मन चिंतेत व्यग्र झाले. चिंतेने मन व्यथित असतानाच मनातून बाबांचे चरण वंदिले, क्षमा याचना केली. बाबा, कृपावंत आहेत दयाघन आहेत जरूर क्षमा करतीलच. मन थोडेसे शांत झाल्यावर प्रथम दिनाचे आठ अध्याय पूर्ण केले व मग आरती केली. त्यानंतर फराळास बसलो.

फराळास सुरवात करणार तोच कानांवर आवाज आला की साधू बाबाको खाना पानी देव. माझ्या मुलीस त्या साधूस पोळी भाजी देण्यास सांगितले. त्याप्रमाणे ती पोळी भाजी घेऊन गेली, त्याने ती घेतली व आणखी दक्षिणा मागितली. मुलगी घरात परत आली व तिच्या पाठोपाठ तो साधू देखील घरात आला. त्याचे अंगात भगवी कफनी होती. दाढी, मिश्या वाढवलेल्या होत्या. डोकीचे केस. शिखाप्रमाणे डोक्यावर बांधलेले होते.

त्याला बसावयास स्टूल दिला. त्या साधूने खोलीचे निरीक्षण केले. श्रीबाबांचा आशिर्वाद फोटो, सती गोदावरी मातांचा फोटो व सत्यसाईबाबांचा फोटो भिंतीवर पाहून समाधान व्यक्त केले. त्याने मला बाहेर बोलावले. एका पेल्यात पाणी मागितले. त्यास पाणी दिले. पण ते पाणी त्याने प्राशन न करता, आमचे हातावर तिर्थ म्हणून दिले तीर्थ दिलेले पाणी साखर मिश्रित जलाप्रमाणे गोड होते. मग वाटीत साखर द्या म्हणून सांगितले. त्याप्रमाणे साखर दिली. वाटीतील साखर चिमटीत घेऊन प्रसाद म्हणून आमचे हातावर दिली. पण ती साखर नव्हती. तर चिमटीतील साखरेचे उदीत रुपांतर झाले होते.

हे दोन चमत्कार पाहून आम्ही आश्चर्यचकित झालो. पण खरा चमत्कार ह्या नंतरचाच आहे. त्याने ११ रुपयेच दक्षिणा मागितली व म्हटले की फक्त येवढ्याचसाठी मला येथ पर्यंत यावे लागले. ह्याचा अर्थ आम्ही त्या क्षणाला समजू शकलो नाही. त्यास आनंदाने रु. ११ दक्षिणा दिली.

त्यावर तो साधू म्हणाला की आता तू काहीही काळजी करू नकोस, मला रु. ११ मिळाले, म्हणून आता तू रु. ११ कोठेही पाठवू नकोस. मन स्वच्छ राहू दे.

वाईट येवढेच वाटते की त्यावेळी, त्याक्षणी हा साधू प्रत्यक्ष श्रीसाई म्हणून आले असावेत असा विचारसुद्धा मनात आला नाही.

गेल्या वर्षीची विस्मृतीची आठवण अगदीच पहिल्याच दिवशी आल्याने, यंदाचे पारायण अपराधी मनःस्थित झाले असते, ह्याबद्दल श्रीसाईबाबांना काळजी होतीच व ते अपराधी मन स्वच्छ करण्यासाठी साधू वेषात येथपर्यंत आले. मन अप्रसन्न असता पारायण माझेकडून होऊ नये अशीच श्रीबाबांची इच्छा असावी म्हणूनच ते येथपर्यंत आले, माझ्या मनास प्रसन्न केले.

ज्याप्रमाणे श्रीबाबा आपल्या दोन मित्रासह डहाणू येथे, बाळासाहेब देवांच्याकडे डहाणू येथे जेवावयास संन्यासी रुपात अवतरले, त्याचप्रमाणे श्रीबाबांनी साधूरुपात येऊन दर्शन दिले व माझी इच्छा पूर्ण केली. ह्यावेळी किर्तनातील अभंगाची आठवण झाली. तो अभंग असा—

हाक मारिली तो धावोनिया आले ।
नाही ओळखले गुरुराया ॥ १ ॥
नाही ओळखले मायेचे पटल
हासे हरीहर, जेवोनिया ॥ २ ॥

बाबाच्या अनेक लीलांपैकी ही एक आहे. म्हणून म्हणतो की—

भक्त कल्याणार्थ कुठेही फिरती ।
शिष्य भावार्थी पाहिजे ॥
श्रीसाईबाबांस लाखो प्रणाम ।

# श्रीसाई—एक अवतार

—सौ. उषा प्रभाकर अधिकारी,
सावित्री भुवन, बंदररोड, रत्नागिरी.

● भगवंताने सज्जनांचे कल्याण व दुर्जनांचे निर्दाळण करण्यासाठी पृथ्वीवर दशावताराने प्रकट होऊन आपल्या प्रत्येक अवतारात पृथ्वीचे संरक्षण करून दुष्ट दुर्जनांना धडा शिकविला आणि धर्म रक्षणाचेही कार्य केले.

प्रभु दत्तात्रेयाचे जे काही पूर्णवतार झाले ते या कारणासाठीच केवळ झालेले नसून मानवात एकमेकाबद्दल प्रेम सहिष्णुता, आदरभाव, ऐक्य निर्माण करण्याची शिकवण देण्यासाठीच झाले. हे अवतार सामान्य माणसाप्रमाणे जन्माला आलेले नाहीत अशा एका अवताराचा, साईबाबांचा आज आपणाला विचार करावयाचा आहे.

शिरडी नामक एका खेड्यात बालवयात फकिर रुपात साईबाबा प्रकट झाले. तेथील रहिवासी म्हाळसापती यांनी 'आओ मेरे प्यारे साई' असे त्यांना म्हटले तेच त्यांचे नाव पडले अन्यथा त्यांचे जन्म गाव, आई वडील, त्यांचे खरे नाव याचा जंगजंग पछाडूनही आजपर्यंत पत्ता लागलेला नाही. स्वतःच्या प्रकटी करणानंतर स्वतःकडे लोकांचे लक्ष केंद्रित व्हावे म्हणून या बालसाधूने काहीही केलेले नाही. आपणहून कोणाला बोलावले नाही कोणाशी ओळख करून घेतली नाही. उलट बाल-वयातही त्यांच्या मुद्रेवरचे तेज, त्यांची शांत पण प्रेमळ नजर, मिस्किल भाव यामुळे लोकच त्यांच्या भोवती गोळा झाले, व हळूहळू त्यांच्या भजनी लागले. लोकात ऐक्य-भावनाप्रेम निर्माण करावयाचे असेल तर त्याला काहीतरी माध्यमाची जरुरी आहे हे त्यांनी ओळखले व काही चमत्कार करुन दाखविले. अर्थात् हे चमत्कार सामान्य माणसाला किंवा सिद्धी प्राप्त झालेल्या एखाद्या योग्यालाही कठीण असे होते. पाण्याने भरलेल्या पणत्या रात्रभर जाळणे हा जो काही विलक्षण चमत्कार त्यांनी केला त्यामुळे लोकांना साईबाबा हे महान विभूती आहे हे पटले.

साईबाबा एका पडक्या जीर्ण मशिदीत राहात. ही मशीद हिंदूच्या वस्तीत होती. मशिदीत जात्यावर दळणे, घंटा नाद करणे या गोष्टी इस्लामी धर्मात त्याज्य मानल्या जातात पण बाबांनी त्या गोष्टी मुद्दामच करुन मुसलमानांच्या धर्मभावनेला तीव्र धक्का दिला. या ठिकाणी सामान्य माणसाने हे केले असते तर तेथील मुस्लीम रहिवाशांनी मारझोड करून त्याला हाकलून दिले असते पण तेथील मुस्लीम बांध-वाना बाबांचे अलौकिक सामर्थ्य अनुभवाने पटले होते. हा माणूस नव्हे तर प्रत्यक्ष

देवच—अल्लाच आहे तो वाटेल ते करू दे. करतोय ते आपल्या कल्याणासाठी हे त्यांना मनोमन पटल्यामुळे कोणीही त्यांना विरोध केला नाही. बाबा मशीदीत राहतात आपणा सारखाच पोषाख करतात सदैव अल्ला मालिकचाच घोष करतात म्हणजे खरोखर ते अल्लाच आहेत असा मुसलमानांचा समज झालेला होता. या उलट मशिदीत राहिले आणि पेहराव मुसलमानी असला तरी मशिदीतील तुळशी वृन्दावन, अग्निहोत्र आणि दीपोत्सव या गोष्टी सतत नजरेसमोर असल्याने आणि एकंदर वागणे हिंदू संस्कृती निदर्शक असल्याने भगवंतच बाबांच्या रुपाने प्रकट झाला आहे असे हिंदूना वाटे.

मनाला अतर्क्य वाटणाऱ्या व विस्मयकारक घटना बाबांच्या बाबतीत पुष्कळ घडवून आलेल्या आहेत. वीतभर फळीवर तीही चिंध्यानी बांधून वर टांगलेली तिच्यावर बाबा कसे झोपत हे एक विलक्षण गूढ होते. अनेकांनी ते कसे चढतात व कसे उतरतात हे पाहण्यासाठी खूप प्रयत्न केले पण हे दैवी सामर्थ्य प्रत्यक्ष डोळ्याने कुणालाही पहाता आले नाही यामुळे त्यांचे अवताररूप येथे सिद्ध होते. बाबा लेंडी बागेत एकटेच जात. तेथे योगसाधना करीत व आपली आतडी स्वतः धुऊन वाळत टाकत असत. तसेच रात्रीच्या वेळी आपल्या शरीराचे अवयवही ते काढून ठेवीत असत. अनेक संतांनी अनेक प्रकारचे चमत्कार केल्याची उदाहरणे त्यांच्या त्यांच्या चरित्रात वाचावयास मिळतात. पण हे बाबांचे चमत्कार नव्हेत तर बुध्दीला न पेलणारे देवपणच आहे हे सिध्द होते.

बाबांना पशूपक्षांची भाषा कळे, माणसाच्या मनातले विचार तो १०० योजने दूर असला तरी ते ओळखत. जन्मोजन्मींच्या गोष्टी नकळत सांगून जात. ज्या भक्ताबद्दल अगर व्यक्तीबद्दल ते असे ते त्यालाच बरोबर कळे. अर्थात जन्मजन्मांतरीची कथा सांगताना ते अशी काही शिकवण देत की त्या भक्ताचे व व्यक्तीचे त्यातून समाधान होई.

बाबांनी सुरवातीला वैद्यकीचे काम केले. लोकांना आपल्याकडे न बोलावता ते स्वतः घरोघर फिरले. निरनिराळया वनस्पती वापरून त्यांनी लोकांना रोगमुक्त केले. काहीवेळा डोळयात बिब्बा घालून डोळे बरे करण्याचे अघोरी उपायही केले यामध्येही त्यांचे देवत्व दिसून येते. स्वतः बाबांनी आपण अवतार आहोत असे कधीच भासवले नाही. स्वतःचा डामडौल मिरविला नाही. सगळे भलेपण देवाकडे-एक अल्लाकडेच सोपविले. स्वतः फाटके कपडे, भिक्षान्न, मातीच्या कोळंब्यातच जेवणे हे शेवटपर्यंत ब्रीद राखले. असामान्य असूनही सामान्याप्रमाणे जीवन कंठले. स्वतःची प्रौढी न वाढवता शिरडीतील जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला.

हिंदू-मुसलमान, पार्शी ख्रिश्चन हे मानवाने निर्माण केलेले पंथ आहेत परमेश्वराला सर्वच लेकरे सारखी आहेत हे सर्वठिकाणी प्रेम दाखवून त्यांनी सिद्ध केले. शिरडीत सहभोजनाची प्रथा पाडून लोकांत एकमेकाबद्दल जिव्हाळा आदरभाव निर्माण केला. लोकांकडून दक्षिणेच्या मिषाने पैसे घेतले पण त्यातून त्यांचेच कल्याण केले. भक्तांना संकटाची सूचना अगाऊ देऊन त्यांचे रक्षण केले. मनुष्याला जो मी पणाचा अहंकार आहे त्याचे दहन एकट्या साईबाबांनीच चमत्काराद्वारे शिक्षण देऊन केले.

समाधी काळापूर्वी सुमारे ३६ वर्षे प्रकृति अगदी क्षीण झाली असता स्वतःचा प्राण सतत ३ दिवस ब्रम्हांडी नेऊन ठेवला होता. ही गोष्टही त्यांच्या अवताराची साक्ष देते. आपल्या भक्तांच्या मनीच्या इच्छा पूर्ण करता करता त्यांचेही हातून जनतेसाठी काहीतरी चांगले कार्य एकट्या साईबाबांनीच करून घेतले. आजची वैभवशाली सुंदर शिरडी ही प्रत्यक्ष त्याची साक्ष आहे.

बाबांनी स्वतःकडे देवपण तर घेतले नाहीच पण कीर्तने केली नाहीत, प्रवचने केली नाहीत, भाषणे केली नाहीत पण आपल्या साधुवृत्तीने, गोडवाणीने चमत्कार करता करता बंधुत्वाची, सर्वसमानधर्मीयत्वाची शिकवण जनतेच्या मनावर पूर्ण बिंबवली. श्रद्धा व सबुरी आणि एक माझे नाव घ्या म्हणजे तुम्ही बेडा पार व्हाल असे ते बोलत.

स्वतः समाधी घेतल्यानंतरही त्यांना स्वतःच्या अविनाशत्वाचा भक्तांना दाखला दिला असून सर्वतोपरी मी तुमचे रक्षण करीन, तुमी माझ्याकडे प्रेमाने पाहा म्हणजे मीही तुमच्याकडे प्रेमाने पाहीन असा भक्तांना दिलासा दिला आहे. बाबांचा समाधीकाल होऊन आता ६२ वर्षे झाली. परंतु अजूनही त्यांच्या भक्तांना त्यांच्या अलौकिक सामर्थ्याचे प्रत्यय अजूनही येत आहेत. किड्या मुंग्यासारखी माणसे शिरडीत जमत आहेत बाबांना नवस बोलत आहेत. त्यांचे हेतू पूर्ण होत आहेत इतकेच नव्हे तर बाबा सांगून गेले आहेत की—

मग जो गाई वाडे कोडे । माझे चरित्र माझे पोवाडे
तयाचिया मी मागे पुढें । चोहीकडे उभाच ॥
असे निक्षून सांगणारे । सांगितल्या प्रमाणे वागणारे
क्षणोक्षणी त्याचा प्रत्यय देणारे प्रभु साईनाथ
अवतार नव्हेत असे कोण म्हणेल ?

● ● ●

# ★ श्रीसाई एक अवतारी सतपुरुष ★

—श्री. हेमंत प्रभाकर खेडेकर
अभ्युदयनगर, ३८/२७०६ मुंबई नं. ३३

● काही काही गोष्टींना काळाचा दाहक हात लागू नये असे वाटत असते. ज्याप्रमाणे, गुलाबाचे फुल कधी कोमेजून जावू नये किंवा फुलपाखरावरील रंग कधीही नष्ट पावू नये ही आपली अपेक्षा असते, इच्छा असते. पण ते होणे नाही कारण काळ हा असा प्रकार आहे की तेथे ह्या मानवाचे काय चालणार ? आपण एक अवतारी सत्पुरुष परंतु आपण देखील आम्हास उदाहरण देवून गेलात. आपल्या महानिर्वाणाला आता साठ वर्षे झाली तरी सुद्धा आपली किर्ती, आपले सामर्थ आजही ह्या घडीला सूर्यासारख्या प्रखर तेजाने तळपते आहे, संदेश देत आहे.

आम्ही श्रीसाईबाबांची भक्ती करतो. भक्ती का करतो तर त्यांच्यावर आमचा विश्वास आहे. एक श्रध्दा आहे. श्रद्धेचे मूळ स्वरूप, श्रध्देचा अर्थ "सत्य धारण करण्याची शक्ती" असा होतो. तो लक्षात घेतला म्हणजे, श्रध्दा व बुद्धीवाद यातले अंतर लोप पावते व जिज्ञासा वाढते. आता जिज्ञासा वाढली म्हणजे काय. श्रद्धाच वाढली. जिज्ञासाने जागृत झालेली बुद्धी ज्ञानाचे आकलन करते व श्रद्धा ते ज्ञान दृढ करते. जेथे जिज्ञासा व ज्ञान आहे तेथे श्रद्धाही निर्माण होणारच. आता हेच पहाना. श्रीसाई, आपण कधी मला दृष्टांत देवून आशिर्वाद दिलात ? कधी प्रसंग घड-विलात ? नाही, असे नसताना देखील आपल्या ठिकाणी आपल्या चरणी एक श्रध्दा बसली व श्रीसाई, आपल्याबद्दल माझ्या अंतःकरणात प्रेम, आदरयुक्त भाव निर्माण झाला आणि कालांतराने त्याचे सामर्थ्य ही दिसू लागले व आम्ही श्रीसाईंच्या आणखी जवळ जावू लागलो.

आपल्या ह्या पुण्य भूमीवर अनेक साधू संत झाले त्यांनी आप-आपल्या खास शैलीने आम्हा मानवाना सन्मार्ग दाखविला. परमेश्वरप्राप्तीचा खरा मार्ग दाखविला; परंतु श्रीसाईसारखे मौल्यवान रत्न एकच. अनंत आकाशात जसा चंद्र येवून आपल्या असंख्य तारकापुंजांना आपले तेज द्यावे व त्यांना लख लख प्रकाशित कराव्या. तसे श्रीसाई आपण चंद्र आहात व आम्ही सेवक आपल्या तारका. आपल्या तेजाने आपण आम्हास दिपवून टाकले. आपल्या विषयी ओढ वाटू लागली. त्या ओढीने आम्ही शिर्डीस येऊ लागलो. आपली समाधी मंदिरी असलेली शांत प्रसन्न मूर्ति मनसोक्त डोळे भरून पाहू लागलो. डोळ्यात मावेनाशी झाली तेव्हा अंतःकरणात

साठवू लागलो, न पेक्षा साई भजनी लागलो. आता असे होणे म्हणजे एक दैवी सामर्थ्यच, आणि ह्याच सामर्थ्याची किमया आपण माझ्यावर दाखविली.

मानवी गुरु कां करावा हा एक प्रश्न, तर आपला वृथाभिमान घालविण्यासाठी मी पणा नष्ट करण्यासाठी. सद्गुरु समोर नत मस्तक केल्याने नाहीसा होतो. कारण आपल्यासारख्या शरीराच्या परंतु श्रेष्ठ व्यक्ति समोर आपले सारे भले बुरे कर्तृत्व त्याच्या चरणी अर्पण करतो सद्गुरुस शरण आल्याशिवाय आपला वृथाभिमान, मी पणा नाहीसा कसा होईल. एकदा कां आपल्यातला मी पणा नाहीसा झाला तर सद्गुरु आपल्या सानिध्यात येतात जसे डोळ्यात काही जात असेल तर आपल्या पापण्या आपो आप लवतात किंवा शरीराला काही लागल्यास हाताची चटकन हाल-चाल होते. त्यांना तसे करावे लागत नाहीत. सद्गुरु श्रीसाईनाथांचेही तसेच आहे त्यांना न सांगता ते भक्ताचे भले करतात. भक्त संकटात असेल तर धावून येतात सन्मार्ग दाखवितात. त्या योगे आपण उत्साही बनतो व आपण श्रीसाई सद्गुरुंच्या आणखी जवळ जातो.

श्रीसाई आपले सामर्थ्य काय वर्णावे ? आपल्या कृपेनेच माझे आपल्या चरणी मन वळले. आपल्या "श्री साई" ह्या नामाची ओढ लागली. त्यामुळे एक गोष्ट लक्षात आली आणि ती म्हणजे, श्रीसाई आपले आहेत आपण श्रीसाईचे आहोत ही भावना जेव्हा आपल्या मनात निर्माण होते तेव्हाच आपण श्रीसाईना अंतकरणा-पासून पाहू शकतो. आपल्याला उत्साहीत करणाऱ्या गोष्टी म्हणजे साईभक्ती आपण ती नित्यनेमाने केली असता त्याचा अद्भुत परिणाम दिसून येतो. त्यामुळे आपले दौर्बल्य दूर करू शकतो आपल्यातला मीपणा दूर करून आपण समर्थ व निश्चयी होवू शकतो. तरीसुध्दा शेवटी एक रुखरुख लागून राहिली आहे. सागरातल्या एका थेंबाला कधी संपूर्ण सागर दिसू शकला का ? परंतु त्याची त्याला जाणीव होऊ शकेल आणि आपण आपणाला तर ह्या विश्वसागरातील एक थेंब आहोत ही जाणीव झालेली नाही.

☆

# निष्काम कर्मयोगी श्री साईबाबा

—श्री. महादेव दत्तात्रय भिडे
११९५ सदाशिव पेठ, पुणे ३०

● भारत ही संतांची, सिध्दांची, योगीजनांची भूमी होय. याच भूमीत श्रीराम कृष्णा दिकांचे अवतार झाले. प्रभूरामचंद्रांनी आदर्श कर्तव्य पालन करून नीती व न्याय याची शिकवण समाजास दिली. भगवान श्रीकृष्णांनी स्वधर्माचे पालन करण्याची व राजनीतीची शिकवण, कुरुक्षेत्रावर अर्जुनाचे निमित्त करून समाजास दिली. सिध्द, संत व योगीजनानीही वेळोवेळी अवतार घेऊन सर्व मानव ही एक परमेश्वराचीच लेकरे आहेत. हे पटवून समाजातील दुही व भेदभाव, उच्चनीच भाव कमी केला, व समाज कल्याणासाठी आपले देह चंदना परी झिजवले. या सिध्द अवतारापैकीच शिर्डीचे श्रीसाईबाबा हे सिध्द अवतार होत.

श्रीसाईबाबांनी आपण कोण कोठून आलो याचा उल्लेख फारच क्वचित केला. ते वागत बोलत, त्यावरून ते हिंदू की मुसलमान हे गूढच होते. त्यांच्याबद्दल जे संशोधन झाले त्यावरून ते ब्राह्मण होते. त्यांचे कान टोचले होते. जालना जिल्ह्यातील सेलू गावी त्यांचा जन्म झाला. लहानपणीच माता-पीता निवर्तल्यामुळे ते पोरके झाले. एका महान सिध्द, वृध्द पुरुषानी त्यांना आश्रय दिला व सहवास दिला व योग विद्या शिकवली त्यांना एक वीट दिली ती बाबा सदैव आपले जवळ संभाळीत व ती शेवटपर्यंत त्यांचे जवळ होती. त्यांचे गुरुंचे नाव व्यंकुशा. बाबांनीच उल्लेख यांचा केला आहे. त्यांचे ( बाबांचे ) गुरुंनी तू जेजुरीस जा असा आदेश दिल्याने श्रीसाईबाबा काही दिवस जेजुरीस साधन करीत कडेपठारावर होते. त्यावेळी ते एक पोते पांघरत मिळेल त्या भिक्षेवर राहात. त्यावेळी पुणे येथील कै. परीटबाबा, हे सत्पुरुष हे जेजुरीस नित्य जात. त्यांचेबरोबर कै. वोकील महाराजही असत. श्रीसाई बाबांना साधन करीत बसत असल्याचे पाहिले होते असे परिट बाबांनी आपल्या भक्तांना सांगितले आहे.

जेजुरीस खंडोबांची आज्ञा झाल्यावरून श्रीसाईबाबा हे शिर्डीस एका लग्न वऱ्हाडाबरोबर आले. श्रीसाईबाबांच्या गुरुंची समाधी एका लिंबाखाली होती त्या खाली ते बसत. त्यांनी या समाधीचा, आपले गुरुच्या समाधीचा जिर्णोद्धार केला. शिरडी हेच क्षेत्र बाबांनी आपले कार्यक्षेत्र केले. ते शेवटपर्यंत.

नगर जिल्ह्यात व आसपासचे प्रदेशात व भारत भर हिंदु मुसलमान जमातीत वैमनस्य वाढून दंगे होत होते. समाजाचे जीवन विस्कळीत झाले होते. समाजातील हे दुहीचे वैमनस्य कमी करून जाती जातीत सलोखा करण्याचे कार्य केले. ही त्यांची एक महान कामगिरी होय.

शिर्डीस श्रीसाईबाबा दिवसभर काहीना का उद्योग करीत. ते आजानुबाहू होते. अंगात कफनी, हातात, चिमटा, व डोकीस एक फडके बांधून असत व भिक्षेसाठी एक टमरेल पत्र्याचे सदोदीत जवळ बाळगीत व खाकेत झोळी. कधी ओढ्याकाठी, कधी पारावर कधी गावात हिंडत. रोज दुपारी बारा वाजता भिक्षेसठी बाहेर पडत. ५।६ घरीच भिक्षा मागत. भिक्षेस जे मिळे ते मातीच्या कुंडीत सर्व टाकीत. ती कावळे कुत्रीही खात. तरी त्याकडे लक्ष देत नसत. ध्यानात सदा रहात व आठवण झाली तरच त्या कुंडीतीलच भिक्षेचे मिळालेले खात.

शिर्डीस लेंडी बाग म्हणतात ती बाबांनीच स्वतः तयार केली. स्वतःच्या खांद्यावर, मातीच्या घागरीतून पाणी आणून रोज नित्य झाडाना ते पाणी घालीत. श्रीसाईबाबा प्रथम शिर्डीस आले तेव्हा खंडोबाचे देवळात बाबा गेले. तेव्हा तेथील म्हाळसापतीनी 'आवो साईबाबा' म्हणून हाक त्यांना मारीली व हेच म्हाळसापती बाबांचे एक भक्त होत तेव्हा पासून साईबाबा,' हेच नाव पुढे बाबांना पडले. या नावानेच ते पुढे प्रसिद्धीस आले.

बाबांचे आचरण शुद्ध होते, ब्रम्हचर्य, अखंड नामस्मरण, योग सामर्थ्य, यामुळे बाबांच्या डोळयात एक तेजस्वी चमक होती. ते ज्यांच्याकडे पहात त्यांच्या हृदयाचा ठाव घेत, ते स्त्रीया व पैसा यापासून अलिप्त होते. पैशांचा संग्रह त्यांनी कधीही केला नाही. जे भक्त त्यांचेपुढे ठेवीत ते वाटून टाकीत. रामनवमी उत्सव श्रीसाईबाबांनी चालू केला. त्या उत्सवात कीर्तनकार, प्रवचनकार व उरुसात सर्वांना वाटून टाकीत. स्वतःकरता त्यांनी पैशाचा उपयोग केला नाही. स्वतः आजारी पडले असताना कधीही औषध घेतले नाही. भीक्षा शेवट पर्यंत मागितली अगदी आजारी असताना सुद्धा.

श्रीसाईबाबांचे वास्तव्य एका पडक्या मशीदीत असे. लोकसंग्रह करून लोकांना सन्मार्गी लावण्यासाठी आटोकाट प्रयत्न त्यांनी केला. एकदा मशीदीत पणत्यांचे चिरकदान लावण्याची इच्छा झाली. तेलाची जरुरी होती. गावात त्यांना कोणी तेल दिले नाही. बाबांनी योग सामर्थ्याच्या द्वारे पणत्यात पाणी घालून त्या पेटवल्या हे

जेव्हा लोकांनी पाहिले तेव्हा अवलीया, म्हणून बाबांना लोक मानू लागले, व भक्त-गण वाढू लागले. बाबांचे भक्तात हिंदू, मुसलमान, पार्शी सर्व जमातीचे, गरीब, श्रीमंत सर्व तऱ्हेचे लोक होते. त्यातील आर्त, पीडित, भक्तांची दुःखे धुनीतील उदी देऊन ती दूर करीत ' अल्ला तेरा भला करेगा ', म्हणून समाधान करीत.

श्रीसाईबाबांनी भक्तीमार्गाचा प्रसार केला. ज्यांच्या त्यांच्या धर्मप्रमाणे व उपासनेप्रमाणे बाबा त्यांना वागावयास सांगत. ज्यांची जी उपासना व ज्यांचे जे दैवत त्या भक्तांना त्यांच्या दैवतांच्या स्वरूपात दर्शन देत. त्यामुळे भक्तांना समाधान लाभे. बाबा मशीदीत राहात. तेथे सतत धुनी जळत ठेवलेली त्यांनी होती. ते धुनी जवळ बसत. नंदादीपही ते सतत ठेवीत. धुनीत तांदुळावर तूप घालून ते भक्तास धुनीत टाकावयास सांगत व त्यातील काही ते खातही.

बाबांचे भक्तात मुसलमान होते. बडेबाबा म्हणून बाबांनी एका मुसलमानास सतत आपले जवळ ठेवून घेतले होते. मुसलमान, हिंदू धर्म तसाच ख्रिश्चन धर्माबद्दलही त्यांना आदर होता. बाबांचेकडे एक भक्त येणारा खिश्चन होता. त्याला बाबा आपला भाऊ मानीत. बडेबाबा व इतर मुसलमानांनी श्रीसाईबाबांना एकदा खुदबा पढण्यासाठी गावाबाहेर येण्याची विनंती केली. पण बाबा एकदाही नमाज पढावयास गेले नाहीत. स्थानिक मुसलमानांनी मोहरममध्ये ताज, मशीदीत बसवू द्यावा म्हणून विनंती केली. बाबांनी आनादर न करता तो त्यांना बसवू दिला पण कायम ठेवू दिला नाही. मशीदीचे आवारात एक मुसलमान शेरा (फुलाचा हार) घेऊन पवित्र जागी घालावा म्हणून आणला असता बाबांनी तो शेरा (हार) मारुतीस घालण्यास सांगितले.

बाबांना सर्व धर्म मान्य असले तरी लोकांनी आपला धर्म सोडून परधर्मात जावे हे मान्य नव्हते. फकीर बाबा ऊर्फ बडेबाबांनी एका हिंदूस मुसलमान धर्माची दिक्षा देऊन त्यांच्याकडे आणले तेव्हा बाबांनी त्या धर्मांतर केलेल्यास हातानी झिडकारून ढकलून दिले व त्यास तू तुझा बाप बदललास, असे बोलून नापसंती दर्शविली होती.

भक्तामधील गुणीजन ओळखून त्यांना भक्तीमार्गाला लावले. दासगणू हे त्यापैकीच होते. ते लावण्या करून तमाशास देत. बाबांनी दासगणूंना किर्तन करण्याची आज्ञा दिली व रामनवमी उत्सवात किर्तन करावयास लावले. दासगणूंनीही हे व्रत आजन्म पाळून भक्तीमार्गाचा प्रचार किर्तनातून केला.

श्रीसाईबाबांची शिकवण " जैसी जिसकी नियत वैसी उसकी बर्कत ", नेकीने वागा, कोणाचा द्वेश करू नका. सर्व धर्म समान माना. लहान थोर भेदभाव मानू

नका. रंजले गांजले यांची दुःखे दूर करा, गरीबांना मदत करा, अशीच होती. बाबांचा एक भक्त कुष्टरोगी होता. तो गांजला होता. त्यास बाबांनी उदी देऊन दुःखमुक्त केले. कुष्टरोगी म्हणून त्यास दूर लोटले नाही. त्यांचे हातून आपले पायास मालीश करून घेतले. दलित म्हणूनही कोणास तुच्छ मानले नाही. बाबांचेकडे पटेल म्हणून एक भक्त होता. तो मशीदीत झाडूवाल्याचे काम करी व बाबांची सेवा करी त्यास बाबांचे एक भक्त श्री. रासने यांनी जेवावयास पाठविणेची विनंती केली. का ? तर बाबाही त्याबरोबर येतील. बाबांनी पटेल येईल पण त्यास तुच्छ न लेखता आपले पान त्याजवळच मांड म्हणून सांगीतले. त्याप्रमाणे रासने यांनी तसे मांडलेही. बाबांनी जेवावयास यावे म्हणून प्रार्थना करताच बाबांचे पानावर ऐन वेळी एक काळा कुत्रा येऊन प्लेटमधून पदार्थ खाऊन गेला. ही बाबांनी प्रचिती दाखविली होती.

योग, कर्म, ध्यान व भक्तीमार्गाचा भक्तांमधून प्रचार केला. गीता, एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी हे त्यांना पूज्य होते. "ए तो हमारा खजीना है" असे बाबा म्हणत ज्ञानेश्वरांचे आरतीचे वेळी बाबा हात जोडून डोळे मिटून आरती होईपर्यंत उभे रहात. भक्ताचा अधिकार पाहून त्यास एक पायरी पुढची देत. परंतु बाबांनी कधी कोणास शिष्य केला नाही की मठ स्थापना. आज्ञा पाळणे, सेवा, श्रद्धा, व सबुरी ह्या भक्तीमार्गाच्या वाटा त्यांनी भक्तांना दिल्या व भक्तांची परमेश्वरावरील श्रद्धा वाढविली.

कर्म मार्ग बाबांनी सर्व हयात भर अनुसरला भक्तांनी गृहस्थाश्रमात राहून परमार्थ कसा करावा हे शिकविले. आपले सर्व आयुष्य लोकसंग्रह व जन कल्याणार्थ संपूर्ण वैराग्यशील जीवन जगून निष्काम कर्म आचरून, श्रीसाईबाबांनी आपला देह चंदनापरी झिजवून दि. १५ माहे ऑक्टोबर १९१८, दसरा शिलंगणांचे दिवशी आपली जीवनयात्रा संपविली. त्यांचे इच्छेप्रमाणे त्यांचा देह बुटीचे वाड्यात ठेवला गेला. हजारो भक्तांचे ते श्रद्धास्थान आहे. बाबा जरी देहाने गेले असले तरी अदृश्य शक्तीने हजारो भक्तांना आपली प्रचिती देत आहेत व कोणाना, कोणास नाना रूपे, नाना हस्ते मदत करून दुःखे दूर आजही करीत आहेत याची आजही प्रचिती येते दिवसे दिवस बाबांचा भक्तगण वाढतच आहे. हे प्रचितीचे अनुभव श्रीसाईलीला मासीकातून गरीबापासून श्रीमंतापर्यंत, पदवीधर, डॉक्टर प्रसिद्ध करीत आहेत. अशा ह्या एका महान निष्काम कर्मयोगी सिध्द अवतार श्रीसाईबाबांच्या चरणी शतशः प्रणाम !

# माझी साईभक्ति

—सौ. कौमुदी आजगावकर
वाय ११।१६ सरकारी वसाहत मुंबई-५१

● 'माझी साईभक्ति' हे शब्द उच्चारताना माझी भूमिका नम्रतेची आहे, कृतज्ञतेची आहे. कारण श्रीसाईबाबांसारख्या अत्यंत श्रेष्ठ पण जगावेगळया संताची 'भक्त' म्हणवून घेण्याची पात्रता माझी नाही. त्यांच्यावर भक्ती करण्याचे भाग्य मला लाभले ते केवळ योगायोगानेच. त्यांचा माझ्या जीवनात प्रवेश झाला नसता तर त्यांच्या थोर विभूतीमत्त्वाच्या आणि दिव्य प्रेमाच्या अनुभवाला मी मुकले असते. म्हणूनच मला भक्तीचा अहंकार नाही. माझी भक्ति ही एक 'कृतज्ञ जाणीव' आहे.

श्रीसाईबाबांचा फोटो लहानपणापासून माझ्या माहेरी देवघरात पूजला जात असे, माझ्या वयाच्या १८ व्या वर्षी मी एस्. एस्. सी. च्या वर्गात असताना मिलिंदमाधव-कृत श्रीसाईबाबांचे ओवीबद्ध महात्म्य माझ्या वाचनात आले. श्रीबाबांचे चमत्कारी व्यक्तिमत्व, त्यांची भक्तांवरील कृपा, त्यांची विलक्षण वागणूक, भक्तांना त्यांनी दुर्धर व्याधीत व संकटात दिलेला दिलासा, यामुळे मला आपल्या आयुष्यात नवा प्रकाश प्रवेश करीत आहे असा भास झाला. जणू या पूर्वीचे आयुष्य एक अपूर्णता होती. नव्या पूर्णतेचे आणि आनंदाचे किरणच माझ्या अस्तित्वात शिरले, असेच मला वाटले. भक्तीची जादू अशी असते. भक्तीचा प्रकाश आला की सारे जीवनच आनंदाने बहरून जाते. श्रीबाबांची भक्ती म्हणजे तर वसंत ऋतूचे आगमनच होय. वसंत ऋतू सुरू झाला की सृष्टीचे सारे स्वरूपच पालटून जाते. वृक्षाना पालवी फुटते. पुष्पवेली फुलांनी बहरतात, कोकिळेचे कूजन सुरू होते. सुंदर पक्षी झाडावर कलख करताना दिसतात. श्रीबाबांच्या भक्तीच्या प्रवेशाने आयुष्यात सौख्याने सौहार्दाने करुणेने, माणुसकीने पहाण्याची नवी दृष्टी फुलते. श्रद्धेला एक आधार मिळतो. परमेश्वरावरील नितांत प्रेमाने मन द्रवते. जशी श्रद्धा तसा अनुभव वृद्धिंगत होऊन भक्ति भावना स्थिर होते. संकटाचे व विपत्तिचे आघात शांतपणे सहन करण्याचे बळ अंगी येते. असा विश्वास बाणतो की "सकळ जीवांचा करितो सांभाळ। तुज मोकलील ऐसे नाही। नको करू खेद कोणत्या गोष्टीचा। पती लक्ष्मीचा पहातसे।" जिथे जावे तेथे श्रीबाबांसारखा सांगाति खेळवीत आहे, हाती धरून चालवीत आहे. ही श्रद्धायुक्त भावना केवढी तृप्तीची, आनंदाची व साफल्याची आहे.

श्रीबाबांचा असा माझ्या जीवनात १९५४ साली प्रवेश झाला व पुढील आनंदयात्रेची सुरुवात झाली. याच सुमारास माझ्या भावी पतीच्याही जीवनात

श्रीसाईबाबांनी आपले पाऊल ठेवले. त्यापूर्वी त्यांना श्रीबाबांची माहिती असली तरीही श्रीबाबांच्या जीवनचरित्राची त्यांना १९५४ पर्यंत मुळीच ओळख नव्हती. एक प्रासादिक चरित्रलेखक श्री. कवडे यांनी लिहिलेले बाबांचे चरित्र व त्यांच्या भक्त मंडळीचे अनुभव त्यांच्या वाचनात त्यावर्षी येऊन त्यांचे मन बाबांच्या चमत्कार लीलांनी भारावून गेले होते. माझ्या पतिगृही दत्तावतार श्री अक्कलकोट-स्वामी भक्तीची मूळ परंपरा फार जुनी होती. त्यानंतर या साईभक्तीचा प्रवाह या प्रवाहाला येऊन मिळाला, ती १९५४–५५ साली. सर्वात मौजेची गोष्ट म्हणजे माझ्या साईभक्तीची व उपासनेची जशी मिलिंदमाधवलिखित साईचरित्र पठनाने सुरुवात १९५४ साली झाली. तशीच माझे पति श्री. चकोर आजगावकर यांच्या आयुष्यातही याच छोट्या पुस्तिकेने व श्री. कवडे यांनी लिहिलेल्या प्रासादिक चरित्राने साईभक्तीचा श्रीगणेशा लिहिला. हा एक मोठा योगायोगच आहे. जणु हे दोन्ही भक्तीचे प्रवाह माझ्या सासरमाहेराला एकाच वेळी उगम पावले व त्यांचा प्रेमसंगम १९५६ साली आम्हा दोघांच्या विवाहाच्या रूपाने घडला.

आमच्या विवाहबंधनाला श्रीसाईबाबांच्या एका भक्ताच्या मध्यस्थीचा हातभार लागला. ही देखील एक उल्लेख करण्यासारखी बाब आहे. माझे माहेर कारवारचे. माझे वडिल तेथे आपला वैद्यकीय व्यवसाय चालवितात. माझे पती हे एम्. ए. होते व सचिवालयात काम करीत होते. आमची सांपत्तिक परिस्थिती चांगली नसल्याने व एवढ्या दूर ठिकाणचे हे स्थळ जुळून येईल व अनेक सधन कुटुंबातील मुली सोडून ते माझ्याशी विवाह करतील हे संभवनीय नव्हते; परंतु योगायोगाने एका नातेवाईकानी हे स्थळ आमच्या भावी श्वशुरांना सुचविले. प्रथम या खटपटीला यश आले नव्हते. परंतु मूळ कारवारच्या ज्या गृहस्थांनी त्यांना श्री. कवडे यांचे चरित्र आणून वाचावयास दिले होते व त्यांची साईबाबांवरची श्रध्दा दृढ केली होती, त्या श्री. किंदळकर यांनीच आमच्या कुटुंबाच्या सच्छील, सुस्वभावी व सुखरूप परंपरेची त्यांना ओळख करून देऊन माझी शिफारस केली. त्यामुळेच हा विवाहयोग आकाराला आला. मी कारवारहून मुंबईस आले, व विवाहानंतर माझ्या सासरी वयाच्या २२ व्या वर्षी म्हणजे १९५६ मध्ये तेथील साईभक्तीच्या प्रवाहाशी एकरूप झाले.

त्यापूर्वी माझ्या पतीना १९५५ मध्ये श्रीबाबांच्या कृपेचा एक मोठा प्रत्यय आला होता. अस्पृश्यता निवारण या विषयावरील सरकारी नाट्यस्पर्धेत त्यांना पहिले रु. १००० चे बक्षीस मिळाले. हे बक्षीस मिळाल्यास सहकुटुंब शिरडीस येण्याचे त्यांनी ठरविले होते. त्या प्रमाणे झाले. दांडेकर, शुक्ल, कुसुमाग्रज वगैरे नाटककारांची नाटके स्पर्धेला होती. तरीहि यशाची विजयमाला त्यांना लाभली. त्यामुळे त्यांची

श्रध्दा वृध्दिंगत झाली. माझा विवाह १९५६ मध्ये झाल्याने मी त्या साईभक्तीच्या भावनेत समरस झाले. १९६० साली आम्हाला साईकृपेने मोठया खटपटीनंतर वांद्रे येथील सरकारी जागा रहावयास मिळाली. त्यावेळी माझे शिरडीस पहिले जाणे घडले. मी मिलिंदमाधव चरित्रात वाचलेली मूर्ति व तिच्या लीलांची भूमी स्वतः आपल्या डोळयांनी पाहिली. माझ्या डोळयांचे पारणे फिटले, मन बाबांच्या थोरवीने भारावले. व एक तृप्तीचा आनंद घेऊन मी शिरडीहून घरी परतले. ऑगस्ट महिन्यातील शिरडीचा समृध्द निसर्ग नजरेसमोर तरळत राहिला. बाबा त्या भूमीत कोठे बसले असतील, कोठे फिरले असतील, त्यांची मनोमय चित्रे मी रंगवीत होते. त्याकाळचे शिरडीचे बाबांचे समकालीन रहिवासी खरोखरच धन्य होते, असे मला वाटले. कारण त्यांनी शिरडीतील बाबांसारख्या थोर संताच्या लीला व जीवनगंगा स्वतः नजरेपुढे घडताना पाहिली होती व तो सहवासाचा आनंद पुरता लुटला होता.

घरी परतल्यावर श्रीबाबांची आठवण सजीव होऊन घरी दारी वावरू लागली. भाव स्थिर होऊ लागला. संकटाच्या, चिंतेच्या, आनंदाच्या क्षणी श्रीबाबांचे स्मरण होऊ लागले. मन वारंवार बाबांशी हितगुज करीत आत्मनिवेदन करू लागले. माझ्या भक्तीत जिवंतपणा व प्रत्यक्षपणा आल्यास या शिरडी यात्रेने अनुभवाची फार मोठी भर घातली. त्यानंतर ऑफिस कामाच्या निमित्ताने त्यांचे मनमाडमार्गे नागपूर, मराठवाडा इ. भागात दौरे होऊ लागले. त्यांच्याबरोबर मलाही अधून मधून शिरडी येथे जाण्याचा लाभ घडला. शिरडीहून आम्ही दाभोळकरांचे "साईसच्चरित" हे प्रासादिक पुस्तक आणले. त्या प्रासादिक ग्रंथाचे मधून मधून वाचन व सप्ताह केले. त्यामुळे श्रीसाईबाबांची मानवतावादी शिकवण, त्यांचे भक्तावरचे प्रेम, भक्ताच्या संकटात होणारे सहाय्य, त्यांनी बऱ्या केलेल्या दुर्धर व्याधी, त्यांनी सांगितलेले श्रद्धा व शरणांगतीचे महत्व, या गोष्टी मनावर बिंबू लागल्या, वैर, हत्या, ऋण यांचा निषेध, प्रेम, करुणा, सेवेची थोरवी यांची शिकवण समजू लागली. वास्तविक मी कुणीहि पंडिता वा तत्वज्ञानी नव्हते. त्यामुळे या गुणांचा व्यवहारात जेवढा उपयोग व औचित्य आहे. तितपत त्यांचे महत्व मला समजू शकले. ते आचरणात यावे म्हणून थोडाफार जाणीवपूर्वक प्रयत्न हातून घडू लागला. अशा प्रकारे माझ्या श्रीसाईबाबांवरील श्रद्धेची, प्रेमाची जडण-घडण होत गेली.

माझ्या आयुष्यातील पुढील १९६२ नंतरची ५।६ वर्षे बरीच कष्टाची व छाया-प्रकाशाची गेली. माझ्या पतींचीही १९६४ पासून सत्यसाईबाबांकडे दृष्टी वळली. त्यांनी त्यांच्यावर 'सत्यसाईगाथा 'व' भगवंत दक्षिणेत अवतरले' अशी दोन पुस्तके लिहिली. याच काळांत त्यांना व्यावहारिक, व्यावसायिक अडचणींनी घेरलेले होते.

त्यातच १९६६ मध्ये माझे सेप्टीक ॲबॉर्शन होऊन जिवावरच्या दुखण्यातून मी बाहेर पडले. परंतु आमची श्रध्दा मात्र डळमळीत झाली नाही. मला शिरडीला पुन्हा जाण्याचा योग १९६८ मध्ये आला. ह्यांची साधकावस्था बऱ्याच कठीण परिस्थितीतून पुढे चालली होती. त्यांना अनुभव येत होते. त्यांतच १९६७ मध्ये त्यांनी श्रीगुळवणी-महाराजांची शक्तिपात योगाची दीक्षा घेतली. त्यांचे संसारातील लक्ष कमी होऊ लागले. ध्यानधारणा चालू झाली. १९६९ मध्ये एक शिरडी संस्थानचे जुने ट्रस्टी व साईभक्त डॉ. गवाणकर यांची गाठ पडली. त्यांच्याकडून माझ्या व माझे पतीच्या मनावर साईभक्तीचे दृढ संस्कार झाले. बाबांच्या आठवणीने सद्‌गदित होणे, बाबांच्या कृपेच्या अनुभवानी डोळ्यातून अश्रू झरणे अशा प्रकारचे डॉक्टरांचे व्यक्तित्व होते. त्याचा आमच्या मनावर फार चांगला परिणाम झाला. डॉक्टरांनी माझ्या पतीच्या मनावर योगमार्गाबरोबर भक्तीचे संकार केले. मला श्रीरामभक्तीचे महत्व त्यांनी सांगितले व रामनामाचा जप करावयास शिकविले. श्रीसाईरामच्या माझ्या भक्तीस श्रीरामनामाच्या जपाने बळकटी आली. माझ्या पतीनी श्रीसाई-बाबांच्या जीवनचरित्राचा अभ्यास व त्यांच्या तत्वज्ञानाचे विश्लेषणाचे काम १९७० मध्ये नव्या उत्साहाने सुरू केलें. त्यातून 'श्रीसाईगीतायन' हे गीतारामायणासारखे साईचरित्रावरील गीतकाव्य लिहिण्यास त्यांनी आरंभ केला. १९७२ मध्ये माझे शिरडीला अवचित जाणे घडले. त्याची हकीगत मनोरंजक ठरेल. ते ऑफिसच्या कामासाठी औरंगबादेस गेले होते. त्यांच्याबरोबर यावेळी मीही वेरूळची लेणी पहाण्यासाठी औरंगाबादेस गेले. तेथून येताना आम्ही मनमाडला उतरलो. तेथे एका एस. टी. मध्ये बसून आम्ही शिरडी गाठली. गम्मत म्हणजे एस. टी. च्या कंडक्टरने आम्हाला तिकीटे मागूनही शेवटपर्यंत दिलीच नाहीत व शिरडीपर्यंत विनामूल्य सोडले. शिरडीची ही यात्रा अत्यंत आनंदाची झाली. श्रीबाबांच्या चरित्राची व विभूतिमत्वाची मला यावेळी फारच चांगली जाण झाली. त्यामुळे या खेपेचा बाबांच्या भेटीचा आनंद आगळाच ठरला, येताना मनमाडच्या गाडीत जागा कुठेही मिळेना. शेवटी रेसच्या घोड्यांचा एक रिकामा डबा दैवाने मोकळा मिळाला. व आरामशीरपणे मुंबई गाठली.

१९७० मध्ये श्रीसाईबाबांचे गुरुबंधू व ताजुद्दिन बाबांचे शिष्य गणेशभक्त डॉ. घटवाई यांच्यासारख्या सिध्द पुरुषाची गाठ पडून एक नवी दृष्टी आम्हांला मिळाली. गणेशाच्या स्वप्नदृष्टांताप्रमाणे त्यांनी डॉ. घटवाईकडून मंत्रदीक्षा घेतली. तेव्हापासून यांच्या आयुष्याला उत्कट साईभक्तीचे एक वळण मिळाले. डॉ. घट-वाईंच्या प्रगत आंतरिक अनुभवामुळे आमच्या मूळ साईभक्तीला आमच्या आयु-ष्यात एक नवी दिशा मिळाली. १९७२ मध्ये 'साईगीतायन' पुरे केल्यावर आम्ही

सहकुटुंब सहपरिवार शिरडी येथे गेलो व तेथे ३ दिवस वास्तव्य केले. श्रीबाबांच्या सहवासाचा व भेटीचा अधिकाधिक आनंद संपूर्ण कुटुंबाने मिळवण्याचा हा दुसरा योगायोग होता. १९७३ मध्ये मला घरातच मोठा अनुभव आला. मी माझ्या पतीकडे घरात साईदर्शन घडावे अशी इच्छा व्यक्त केली. दुसऱ्या दिवशी सकाळी मी श्रीसाईबाबांच्या प्रतिमेस वंदन करून कामास लागण्याच्या उद्देशाने उठले. तो मूर्तीतील साईबाबांनी हसत हसत उभे राहून माझ्या हातातील पंचारती आपल्या हाती घेतली. असा भर जागृतीत दृष्टांत झाला, त्यामुळे मन फारच तृप्त झाले. श्रीबाबा आपल्या जवळ आहेत, असा विश्वास बाणला. मला देवासमोर आसनस्थ बसल्याबरोबर डोळे स्थिर होऊन देहभाव जाण्याचा अनुभव येऊ लागला. कोणत्याही सत्पुरुषासमोर किंवा दत्तस्थानी असा अद्याप मला अनुभव येतो. एक प्रकारची संसाराबद्दल अनासक्ती व संन्यस्तभाव वाढू लागला. मी 'साईचरिताचा' एक एक अध्याय जमेल तसा वाचण्याचे ठरविले. 'साईसच्चरित' काही काम्य भावाने वाचले तर उद्यापनाच्या दिवशी सत्पुरुष घरी येणे, मुलीच्या आजारात तिला बाबांचे मार्गदर्शक दृष्टान्त होणे असे अनुभव आले. श्रीसाईबाबांची एक प्लास्टरची सुंदर मूर्ती अशीच योगायोगाने आमच्या घरी येऊन दिवाणखान्यात स्थानापन्न झाली.

श्रीसाईबाबांचे माझ्या भक्तिजीवनात असे अनन्य स्थान आहे. संसारात मन थोडे विषण्ण वा अस्वस्थ झाले की मला शिरडीची ओढ लागते. श्रीबाबांच्या शिरडीला ४ दिवस जाऊन निवांत बसावे असे वारंवार वाटत असते. शिरडी हेच माझे पंढरपूर, काशी, द्वारका आहे. शिरडी हेच माझे आध्यात्मिक माहेर आहे.

'श्रीसाईगीतायना'त माझे पतीनी म्हटल्याप्रमाणेच मी अनुकार करीन—

"शिरडी वैकुंठपुरी, साईप्रभु श्याम
संसारी या असार हा श्रमविराम"

बाबाहि मला प्रेमाने म्हणतील—

"मत्स्वरूपी जे रमले
माझेपणी जे विरले
ते अनन्य भक्त मला प्राणाहूनि प्यार"

मला श्रीसाईबाबांच्या शिरडीला वास्तव्य करण्याला पुन्हा किती लवकर योगायोग येतो, याचेकडे माझे डोळे लागून राहिले आहेत.

☆ ☆ ☆

# श्रीसाई-एक अवतार

—श्री. सुरेश शांताराम सातपुते
४९८, जाम बिल्डींग, डॉ. आंबेडकर रोड,
लालबाग, मुंबई १२.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्

श्रीमद्भगवद्गीता अ. ४ श्लो. ७

* ज्या ज्या वेळी धर्मांचा ऱ्हास होतो. मनुष्यप्राणी स्वधर्म विसरुन चुकीच्या मार्गाकडे झुकू लागतो. त्या त्या वेळी धर्म स्थापनेसाठी ईश्वरी शक्ती मानवी देह धारण करून अवतार घेत असते. असे भगवान श्रीकृष्ण श्रीमद्‌भगवद्‌गीतेत म्हणतात. लोक संग्रह करणे हे काही सामान्य शक्तीच्या मनुष्याचे कार्य नाहीच. चुकीच्या मार्गाकडे झुकत चाललेली मानवांची वृत्ति आवरुन ती ईश्वर चरणी दृढ करण्याचे महान कार्य अवतारी पुरुष करीत असतात. तसे म्हटले तर भजन, पूजन कीर्तन इत्यादी प्रकाराने धर्मनिष्ठा जागृत ठेवली जातेच. परंतु केवळ लेक्चरबाजीने पुष्कळ वेळा ह्या गोष्टी साध्य होण्यासारख्या नसतात. कारण, संसारी मनुष्य हा जन्मताच माता भगवती मायादेवीच्या पाशात गुरफटलेला असतो. त्यामुळे सुख दुःखाचे नानाविध तरंग त्याच्या जीवनात नित्य उमटत असतात. सुख, दुःख हे निव्वळ भ्रम आहेत याचे ज्ञान नसल्याने-किंबहूना असूनही तसे मानून आनंदाने रहाणे न साधल्यामुळे मनुष्यास दुःख 'पर्वता एवढे' वाटू लागते. भूकेलेल्यास भाकरीच हवी, त्याला तत्वज्ञानांचा काय उपयोग? याच न्यायाने लौकीक गरजेने अथवा दुःखाने मनुष्य इतका अस्थीर झालेला असतो की, भजन, कीर्तन किंवा धार्मिक ग्रंथवाचन यातून होणाऱ्या उपदेशाने त्याचे तिळमात्रही समाधान होण्यासारखे नसते. उलट दुःखावेगाने मनाची सारासार बुद्धी नष्ट होते व 'सबझूट' म्हणण्या-पर्यंत त्याची मजल जाते. त्याचा विवेक नष्ट होऊन, ईश्वरावरील त्याची श्रद्धा डळमळीत होऊ लागते व तो अधर्माकडे झुकू लागतो. नेमके याच वेळी त्याचे इच्छित लौकिक हेतू अकल्पितरीतीने पूर्ण करून अवतारी पुरुष त्याची ढळू पहाणारी श्रद्धा पुन्हा दृढ करतात. हेच अवताराचे मुख्य उद्दीष्ट असते. म्हणूनच धर्मांचा ऱ्हास होऊ पहातो तेव्हा मी अवतार घेतो. असे भगवान श्रीकृष्ण म्हणतात, याच दृष्टीकोनातून पाहिले तर-**श्रीसाई-एक विलक्षण अवतार:**

आहे हेच सिद्ध होईल. प्रथम संपर्कातच श्रद्धा जागृत करून भक्तांची लौकिक कार्ये वेळोवेळी करून देऊन बाबा आपल्या वरील, पर्यायानेच ईश्वरी शक्तीवरील श्रद्धा दृढ करीत असतात. श्रीसाईंचे या क्षणापर्यंतचे चरित्र पाहिले म्हणजे, वर सांगितलेले कार्य बाबा, सदेह असताना व नंतरही किती दृढतेने करीत आहेत, हे लक्षात घेतले म्हणजे श्रीसाई, हा एक विशेष अवतार आहे व तो याच कारणाकरीता झाला आहे, हे कोणीही मान्य करील. बाबांचे परमभक्त कविवर्य दासगणू महाराज यांचे या बाबतीतील उदाहरण याची साक्ष पटवील. दासगणू सारख्या एका सच्छिल परंतु चुकीच्या मार्गाकडे जाऊ घातलेल्या भक्तास आंगठ्यातून गंगा यमुनेचा प्रवाह वाहाण्याचा चमत्कार दाखवून, चूकीच्या मार्गाकडे झुकणारे त्यांचे मन बाबांनी स्वतःकडे आकृष्ट करून घेतले व त्यांना सन्मार्गावर आणून सोडले. त्यामुळे श्री. दासगणूचे मन साईप्रेमाने इतके भरून गेले की, त्यांची उपजत काव्यस्फूर्ती अगदी उचंबळून आली आणि त्यांचे हातून पुढे बरीच अलौकिक काव्यनिर्मीती झाली. हे एकच उदाहरण इतके बोलके आहे की, त्यावर वेगळे भाष्य करण्याची गरज नाही. परंतु दासगणू महाराजांचे उदाहरण जरी ऐतिहासिक मानले तरीही, आज शिरडी क्षेत्री होणाऱ्या लाखोंच्या गर्दीनेही हेच स्पष्ट होईल. नित्य वाढत्या गर्दीमुळे बाबांचे धर्मस्थापनेचे कार्य चंद्रकळेप्रमाणे दिवसे दिवस कसे वाढते राहिले आहे हेही लक्षात येईल. म्हणूनच **साई सबकी माई** बनून कोणाचे आजार बरे कर, कोणाचे आसाध्य रोग बरे कर, तर कोणाला परीक्षेत यश दे, तर कुणाला नोकरी धंदयात बरकत दे, इत्यादी सर्व प्रकारची लौकीक कार्ये करून देऊन, प्रथमतः आपल्या बालकांना समाधान प्राप्त करून देते, आणि समाधान झाले म्हणजेच मनुष्य शांत चित्ताने विचार करू शकतो, हे जाणून रडणाऱ्या आपल्या बालकास बाबा, प्रथम "लौकिक सुखाचे चॉकलेट" देऊन शांत करतात. त्याची श्रध्दा आपल्या ठायी जडवतात व वेळोवेळी ती दृढ करीत जातात. हळूहळू तो पारमार्थिक मार्गात उन्नती करू लागतो. बाबा आपल्या पाठीशी आहेत...ती समर्थ शक्ती असल्याने कसल्याही संकटाने आपले काहीही वाकडे होणार नाही. याची मनोमन खात्री पटल्याने तो हळूहळू निर्भय होतो. सुखदुःखाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोनच बदलत जातो. अंतर्यामी हळूहळू शांत होत जातो. त्यामुळे पारमार्थिक मार्गात त्याची क्रमाक्रमाने उन्नती होऊ लागते. म्हणून आज कुठलाही साईभक्त पाहिला तर त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे समाधान व शांती आढळून येते. सुखदुःखाच्या लाटेने तो विचलित होत नाही...त्याची शांती ढळत नाही. हेच—

**साईंच्या अवताराचे रहस्य** आहे असे मानण्यास हरकत नसावी. येन केन प्रकाराने लोकांची ईश्वरावरील श्रद्धा अभंग राखून हा भवसागर सुखाने कसा तरून

जाता येईल याची शिकवण देण्याकरिताच श्रीसाईंचा अवतार झाला ही गोष्ट निर्विवाद आहे. केवळ हेच साईंच्या अवताराचे रहस्य नाही तर स्वतःच्या भक्तांमधले मतभेद मिटविणे हा दुसरा एक अत्यंत महत्वाचा उद्देश या अवतारामागे आहे. राम व रहीम जर एकच आहेत. तर त्यांच्या भक्तांमध्ये तंटे कशाला? अर्थात हिंदू व मुसलमान या दोघांतही बंधुत्वाची भावना निर्माण करणे हे

**श्रीसाईंच्या अवताराचे आगळेवेगळे वैशिष्ट्य** ठरते. मनुष्य प्राणी जन्मास येतो. तेव्हा त्याच्यावर काही जाती-पंथाचा शिक्का नसतो. तरीही नसते जाती-पंथ कृत्रिमपणे निर्माण करून तो निष्कारण तंटे-बखेडे करीत बसतो. ही दुही नष्ट करण्याच्या उद्देशाने ही श्रीसाईंचा अवतार झाला आहे. बाबांनी हे उद्दीष्ट साध्य करीत असताना कसलीही लेक्चरबाजी, कीर्तने, प्रवचने केली नाहीत; पण-स्वतःच अशा प्रकारे वागत की, ते घडीत हिंदू तर घडीत मुसलमान आहेत असे वाटे. म्हणूनच दशावतारांनंतर व त्यानंतर झालेल्या दत्तावतारामाणे केवळ धर्मस्थापनेचे एकमात्र उद्दीष्ट न ठेवता त्याचबरोबर भक्तांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करणे हे आणखी एक महत्वाचे कार्य करणारा साई हा एक आगळावेगळा वैशीष्ट्यपूर्ण अवतार आहे हे सिद्ध करते. आणि हे कार्यदेखील बऱ्याच अंशी सिद्ध झाले आहे. या शिवायही आणखी दुसऱ्या एका कारणाकरिताही हा अवतार इतर झालेल्य निरनिराळ्या अवतारांहून अगदी वेगळा आहे. कारण श्रीसाईंचा अवतार हा **श्रीसद्गुरु स्वरूपांतील अवतार** आहे. आणि म्हणून इतर अवतारांपेक्षा कितीतरी अधिक जबाबदारी या अवतारात भगवंताने स्वतःवर घेतली आहे. त्यामुळेच इतर अवतारापेक्षा एक आगळेवेगळे महत्व या अवतारास लाभलेले आहे. कारण सद्गुरुइतके महान जगात दुसरे कोणी नाही. सद्गुरू ही माता आहे, सद्गुरू ह पिता आहे व सद्गुरु हा सत् चित्त आनंद आहे. त्याचे महत्व देवादिकाहूनही अधिक आहे. म्हणून स्वामी मुकुंदराज सद्गुरुविषयी म्हणतात.

> न जे होय देवा असुरा । ते तुझे करणे दातारा ॥
> समर्थ न देखे दुसरा । तुज वाचोनी ॥

—सार्थ परमामृत प्र. १ ओ. ५

आणि साऱ्या जगाचे सद्गुरुत्व स्वीकारल्यामुळे जे देवादिकही करू शकत नाहीत ते करण्याचे सामर्थ्यही या अवताराठायी आहे. या अवतारामध्ये देव व भक्त असा भेद नसून माता व बालक असे प्रेमाचे-वात्सल्याचे नाते आहे. त्यामुळे आपल्या भक्तांस शेवटपर्यंत सन्मार्गावर ठेऊन अंती मोक्ष प्राप्त करून देण्याची

जबाबदारी या सद्गुरुरूपी अवताराने स्वतःवर घेतली आहे. आजही आपल्या लाखो भक्तांना ही सद्गुरूपी माता, आयुष्यभर आत्मस्वरुपाचा प्रकाश देऊन त्यांचे अज्ञान दूर करते. तसेच त्यांना ज्ञानरूपी धन देऊन आपले अवतारकार्य काटेकोर बनावण्याचे कर्तव्यही पार पाडीत असते म्हणूनच म्हणावे लागते

बाबांचा हा अवतार दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक असून भवसागरात गटांगळया खाणाऱ्या आपल्यासारख्या क्षुद्र जीवाकरिता अमोल मार्गदर्शक आहे. परंतु मुळातच हा अवतार अनंताचा असल्याने त्याचा थांग लावणे कठीण आहे. जिथे शेषही थकला तिथे इतरांचा काय पाड ? आपण असा प्रयत्न करणे म्हणजे मुंगीने डोंगर उचलण्यासारखे आहे म्हणून

'अनंता तुला ते कसे रे स्तवावे, अनंता तुला ते कसे रे नमावे, अनंता मुखाचा शिणे शेष गाता नमस्कार साष्टांग श्रीसाईनाथा', इतकेच शेवटी म्हणावेसे वाटते.

● ● ●


# श्रीसाईलीला

## आगामी दोन भव्य विशेषांक

**१. श्रीसाईबाबा महानिर्वाण विशेषांकः—**
**१ अक्टोबर ८० रोजी प्रसिद्ध होईल.**

## श्रीसाईलीला दिवाळी खास अंक

### भक्त अनुभव विशेषांक

१ नव्हेंबर १९८० रोजी थाटात प्रसिद्ध होईल. साई भक्तांनी श्रीबाबांच्या विषयी आलेले आपले अनुभव अगदी थोडक्यात कागदाच्या एकाच बाजूने लिहून पाठवावेत. आपले अनुभव १ ऑगस्ट १९८० पर्यंतच आमचे हाती यावेत. त्यानंतर आलेल्या अनुभव मजकूरांचा स्वीकार करता येणार नाही. सर्व मजकूर संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन, ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ येथेच पाठवावा.

# ....माझी साई भक्ती....

—श्री. किशोर गोविंदराव सूर्यवंशी
मु. पो. हंगा, ता. पारनेर
जिल्हा अ. नगर

"माझे माणूस कितीही दूर।
असेना साता समुद्रापार।
चिडीसारखा मी बांधूनिया दोर
ओढूनि शिर्डीस आणितो ॥"

(अध्याय ५१ श्रीसाईसच्चरित)

प्रस्तुत ओवीद्वारा आपणास साईंची महती प्रकर्षाने जाणवते. कारण साईबाबा हे एक श्रेष्ठ महान असे थोर संत होऊन गेले. म्हणतात ना—

जगाच्या कल्याणा संताच्या विभूती।
देह कष्टविती परोपकारे ॥ (संत तुकाराम)

खरोखर या तुकारामांच्या अभंगाप्रमाणे आपल्या या पावनभूमीतून अनेक संत, महंत, युगपुरुष, युगअवतार जन्मास आले व त्यांनी लोकांना सत्याचा मार्ग दर्शविला, परोपकारासाठी स्वतःला वाहिले. अशाच थोर संतामध्ये श्रीसाईबाबांना अग्रस्थान द्यावे लागते.

मी त्यावेळेस इ. ५ वी मध्ये होतो. माझ्या वडीलांना साईबाबांची पहिल्यापासून आवड आहे व ते साईभक्तही आहेत. वडीलांनी त्यावेळेस श्रीसाईंचा फोटो घरी आणला व मला म्हणाले, "हे साईबाबा आहेत. त्यांना नमस्कार कर! त्याप्रमाणे मी त्या फोटोला नमस्कार केला. खरोखर मला साईबाबा फोटोच्या रूपाने येवून प्रत्यक्ष भेटले, आणि मला बाबांचे प्रथम दर्शन मिळाले. व तेव्हापासून माझ्या साईबाबांच्या भक्तीला प्रारंभ झाला. शिरडीपासून माझे गाव फार दूर आहे. तरीसुद्धा साईचरणी माझी भक्ती जडण्याचे कारण म्हणजे माझे वडील—गोविंद मारुती सूर्यवंशी हे होत. वडील पहिल्यापासून साईभक्त आहेत. त्यामुळे त्य संस्काराने मला साईंची भक्ती जडली. त्यावेळी आमची आर्थिक परिस्थिती फार बिकट होती; परंतु आम्ही साईभक्ती सोडली नाही. अनेक वेळा उपाशी दिवस काढावे लागले. परंतु आम्ही न डगमगता साईनाम सोडले नाही. ही एकप्रकारे साईबाबांनी कसोटीच पाहीली. असो दुःख सर्वांनाच असते म्हणतात ना—

सुख पाहता जवापाडे।
दुःख पर्वताएवढे ॥

परंतु मला एवढे निश्चित सांगावेसे वाटते की, परमेश्वर कोणत्या ना कोणत्या प्रकारे भक्ताचे सत्व पहातो आणि कसोटीला उतरणाऱ्यास पूर्ण सहाय्य करतो.

आमच्या घरात दररोज सकाळ संध्याकाळीं श्रीसाईबाबांची पूजा केली जाते. संध्याकाळी दररोज आरती म्हटली जाते. अशा वेळी सर्वांना उत्साह आनंद वाटतो. श्रीसाईबाबांच्या अध्यायाचे वाचन घरातून सतत चालू असते. साईबाबांचे प्रत्येक चमत्कारांसंबंधी वाचून आपोआपच त्यांची महती पटते. आमच्या शेजारी बहुतेक लोक नास्तीक आहेत ते निंदा करतात, त्यांनाही श्रीसाई सबुरी देतात. म्हणतात ना—

"निंदकाचे घर असावे शेजारी"

प्रत्यक्ष श्रीसाईबाबांना अनेक दुःखे सहन करावी लागली. अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. लोकांनी केलेली निंदा सहन करावी लागली. तिथे आपणासारख्या पामराचे काय चालणार ?

आता मला साईभक्तीची अवीट ओढ लागलेली आहे. मी प्रथम साईबाबांना वंदन करतो व मग दिनचर्या सुरू करतो. साईबाबा अनेक वेळा आम्हाला मदत करतात, संकट निवारण करतात याची आम्हाला अनेक वेळा प्रचिती आली आहे. याचे सुंदर उदाहरण म्हणजे तो दिवस. १४ जानेवारी १९७७ म्हणजे संक्रांत. ऐन याच दिवशी आमचे धाकटे बंधू त्यांना त्यांच्या चुकीमुळे वडील रागावल्यामुळे घरातून फरारी झाले. सर्व ठिकाणी शोधास सुरुवात झाली. म्हणतात ना—

"मन चिंती, ते वैरी न चिंती ॥

याप्रमाणे अनेक विचार मनात आले. कारण अज्ञानात मनुष्य काय करील कोण जाणे. गावोगाव शोध चालू होता. वडील नगराला जावून आले. पण शोध नाही. संध्याकाळ झाली. वडील परत नगराला गेले. तेथे शिर्डी गाडी लागलीच होती. वडील ती गाडी धरून शिर्डीला गेले. रात्री पोहचल्यामुळे शोध करता आला नाही. वडीलानी बाबांचे दर्शन घेतले व मनातील विचार बाबांना सांगितले. ती रात्र वडीलानी थंडीत कुडकुडत काढली, व पहाटे ४ वाजता उठूनसाई मंदीराकडे चालले तो काय चमत्कार, आमचे धाकटे बंधू झोपेतून उठून, डोळे चोळत, समाधीकडे निघाले होते. वडीलांची व त्यांची भेट झाली. खरोखर हेच साईदर्शन, आणि हाच खरा बाबांचा चमत्कार : वडीलांनी भावास मायेने वागणूक दिली. रागावले नाहीत. म्हणतात ना—

माझे माणूस कितीही दूर असो ।
ओढूनी शिर्डीस आणितो ॥

दुसरे एक जीवंत उदाहरण सांगायचे झाले तर माझे मेव्हणे हे भिंगार येथे पॉवर-हाउसमध्ये कामाला आहेत. काम करताना पोलवर अचानक प्रवाह उतरल्यामुळे ते पोलवर चिकटले, फक्त तीन बोटावर ५ मिनिटे लटकले होते. सभोवार अनेक लोक जमले परंतु कोणी कोणत्याही प्रकारे मदत केली नाही. परंतु अचानक तार तुटल्यामुळे, माझे मेव्हणे मृत्यूच्या दाढेतून सुटले. व त्यांना जीवदान मिळाले, "देव तारी त्यास कोण मारी." साईचे हे उपकार मी जन्मोजन्मी विसरणार नाही.

आता आमची परिस्थिती चांगली आहे. साईबाबांच्या कृपाछत्रामुळे अनेक संकटे दूर होतात. आमची आजी याच ७७ साली कैलासवासी झाली. वय १०५ झाले होते. ज्याप्रमाणे बाबांनी वाघाला सद्‌गती दिली त्याचप्रमाणे बाबांनी माझी आजी कै. जानकाबाई यांना वयाच्या १०५ व्या वर्षी काही हाल न होता सद्‌गती दिली.

माझे वडील शिर्डीला वर्षातून अनेक वेळा जातात. आम्ही घरातील सर्वजण वर्षातून एकदा का होईना भेट देतो. माझी लहान बहीण सुमनबाई ( ३ वर्षाची ) ही छोटी असताना सुद्धा तिला साईबाबांची फार आवड आहे. ती सतत बोबडे बोल बोलत असते. " साईनाथ तेले हजालो साथी ..." बाबा म्हणतात ना,

जो-जो मज भजे जैशा जैशा भावे।
तैसा तैसा पावे मी ही त्याशी ॥

मी आता कॉलेजमध्ये जातो. मला बाबांच्या कृपेने परीक्षेत सतत सुयश मिळते अशा प्रकारे मला लहानपणात साईची ओढ लागली. मी आता साईचरित्र ३ वेळा वाचले आहे. अशा या त्रिखंडात कीर्ती गाजलेल्या श्रीसाईबाबांचे मी पामराने कितीही वर्णन केले तरी ते अपुरेच वाटणार! साईच्या कृपेने शिर्डीचे पंढरपूर झाले आहे. शिर्डीला गेल्यावर मन प्रसन्न होते. एक प्रकारे स्वर्गाचे स्वरूप शिर्डीला प्राप्त झाले आहे. साईचा तेथे जीवंत आशिर्वाद आहे. खरोखर सर्व शिर्डी-वाशीयांना मी धन्य मानतो.

पाण्याने दिवे लावणारे साई, व जमिनीवर लाकडाने अग्नी निर्माण करणारी ही साईमाऊली आपणा सर्वांना सतत मदत करो व आपणाजवळ अस्तित्वात राहो. बाबांनी तयार केलेला अग्नी अद्यापही त्यांच्या जीवंतपणाचे व आशिर्वादांचे एक सुंदर दर्शन देतो.

# श्रीसाई—एक अवतार

—सौ. निर्मला देशपांडे,
रामदास पेठ, अकोला.

"पाऊले चालती शिर्डीची वाट
काय मी पामरा वर्णू तिथला थाट"

आजच्या विश्वातल्या ह्या कुंद वातावरणात, निराशेच्या अंधारात चाचपडणार, डुबणार हे मानवी मन शेवटच्या क्षणी एका आशेच्या किरणात नवजीवन पाहत असत. आणि आपल्या कोरड्या निराशेत कुठे तरी एका शांत, आशापूर्ण जीवनाचा ओलावा आहे याची त्याला जाणीव होते. स्वच्छ मनानी तो चहुकडे दृष्टिक्षेप फेकतो, त्या आशेच्या किरणाच्या उगमाच्या शोधात !! त्याला सापडते एका पवित्र वातावरणात न्हाऊन निघालेली शिर्डी, श्रीसाईंच्या पदकमलांच्या धुळींने सर्व पावन झालेली शिर्डी !!

"श्रीसाई"—मानवाच्या चक्षूंच्या तद्वतच मनाच्या दृष्टिक्षेपांच्या मर्यादेरेषे-पलिकडे गेलेले एक असामान्य स्फूर्तिस्थान. एक अवतार, एक साक्षात्कार, एक चमत्कार! श्रीसाईंची कृपा हाच एक अफाट, विशाल साक्षात्कार आहे, कुणाला अवतार तर कुणाला चमत्कार देखील. जोपर्यंत दिवस आणि रात्र आहेत तोपर्यंत ह्या पृथ्वीतलावर त्यांची कीर्ती अमर आहे.

आमचे पूज्य वडील श्री. दामोदर रामचंद्र राजहंस, वय ८४ त्यांच्या प्रकृतीचे, कौटुंबिक सुखाचे सर्व श्रेय साईनाथांनाच देतात. 'मी प्रत्यक्ष त्यांना पाहिले आहे,' असे सांगताना त्यांना जो एकप्रकारचा अभिमान वाटतो त्याक्षणी विश्वातल्या सर्व धांदलीत सुद्धा आपण कृतकृत्य झाल्याचे स्पष्ट जाणवते. त्यांच्या अनुभव सांगण्याच्या प्रवाहात आम्ही इतके मंत्रमुग्ध होतो की घरातले सर्व वातावरण शिर्डीमय होते. मनातले सर्व भाव श्रीसाईचरणी लीन होतात. नकळत श्रीसाईंच्या प्रतिमेसमोर आम्ही नतमस्तक होतो.

संसारात वावरत असताना आपल्यावर घरगुती, सामाजिक संकटे प्रत्यही येतात. त्यावेळेस पाठ न फिरविता श्रीसाईंचे नामस्मरण श्रद्धायुक्त अंतःकरणाने करून धैर्याने तोंडे द्या. श्रीसाईनाथ कुठल्यान कुठल्या अवतारात मदत करण्यासाठी धावून येतातच.

आज जगात अनेक सुखदुःखे आहेत पण सुखाचा आनंद क्षणभंगूर असतो. पण दुःखे त्यावर घण घालतात. याकरिता की काय सर्व प्राणीमात्रांची दुःखे स्वतः

वर घेऊन त्यांना सर्वसुखाचे अमृत पाजण्याकरिता एक अवतार ईश्वररूपी चमत्कार, साक्षात्कार पृथ्वीवर धाडला गेला..." श्रीसाई,"

श्रीसाई खरोखरीच फार मोठे अवतार होते. दीनदुबळयांचे पाठीराखे होते. जणू उन्हाळयात उघड्यावर पडलेल्या रुक्ष जमीनीला मृगाच्या पहिल्या सरीने दिलेला एक दिलासा!! श्रीसाईंनी अनेक रुक्ष जीवांना असाच दिलासा देवून त्यांच्या जीवनाचे फुलबाग फुलविले.

श्रीसाई प्रत्येकाचे अंतर्मन जाणतात. वाईट प्रवृत्तीने जगाचा सर्व नाश करू इच्छिणाऱ्यास त्यांनी जीवनाचा अर्थ समजावून सांगितला. श्रीसाई मानवाच्या कल्याणाकरिताच अवतरले. श्रीसाईंना जात-पात माहित नव्हती. काहीही झाले तरी आपण सर्व मानवच आहोत ना!! सर्वच जातीचे, धर्माचे लोक त्यांच्याकडे येत व त्यांना आपल्या सुखदुःखाची कल्पना देत. श्रीसाई प्रत्येकाला त्यांचे दुःख निवारण्यात त्यांना सर्वतोपरीने मदत करीत आणि त्यांना पूर्णपणे दुःखमुक्त करीत. म्हणून सर्व लोक त्यांच्याकडे भक्तिभावाने जात. साईनाथ त्यांना आपली वेगवेगळी रूपे दाखवीत. ह्या एकाच स्फूर्तिस्थानात कुणाला राम दिसे, कुणी अल्ला पाही तर कुणी येशू पाही.

'शिर्डीत प्रत्यक्ष परमेश्वर अवतरला आहे' असे सगळे मनोभावे बोलून दाखवीत. सत्य परीस्थिती होती, सत्य परिस्थिती आहे, नव्हे का?

श्रीसाईनाथ भूतदया करावयास सांगत. व स्वतः करीत. एखाद्या कुत्र्याच्या पायावर कुणी दगड मारला तर श्रीसाईंच्या पायातून रक्त येई. तर तो मूक प्राणी आपली जखम समजून श्रीसाईंचे पाय चाटत असे. केवढी भूतदया! केवढे प्रेम प्राण्याबद्दल! कुत्र्याने सुद्धा साईनाथामध्ये श्री दत्त पाहिले असतील. नव्हे का? सर्वच वातावरण श्रीसाईमय झाले होते. भारावले गेले होते.

"धन्य-धन्य साईनाथा। तुमचे चरणी माझा माथा॥"

श्रीसाई सर्व भक्तांचे सर्व प्रसंगी रक्षण करतात. याचे अनेक अनुभव अनेकांना आहेत. आमचे सगळेच घराणे साईभक्त आहे. आमचा एक भाऊ एका सोसायटीचा सेक्रेटरी होता. त्याचा नेम असा होता की साईनाथांचे दर्शन केल्याशिवाय पुढे जायचे नाही. कारण श्रीसाईंच्या नुसत्या दर्शनाने, आशिर्वादाने मनाचा आत्म-विश्वास प्रबळ होतो. आपण कोणतेही काम करू शकू ह्याचा विश्वास वाटतो मन म्हणते, "साई, तुझा अवतार खरोखरच एक चमत्कार आहे. तुझ्या साक्षात्कारात प्रत्यक्ष परमेश्वर अवतरतो." त्या दिवशी त्याच्याजवळ प्रसाद घ्यावयास पैसे नव्हते म्हणा वा तो विसरला होता. खिशामध्ये ऑफिसचा वसूल झालेला १–१॥ रुपया होता

पण त्याचा दुरुपयोग करण्याचा विचारही त्याचे मनात आला नाही. प्रसाद पेढे तर घ्यावयाचे होते पण मोठी पंचाईत झाली होती. त्याने श्रीसाईंचे स्मरण केले व क्षमा मागितली. इतक्यात, "काय भालेराव! बरेच दिवसांनी भेटलात" असा परिचयाचा आवाज ऐकू आला. त्याने पाहिले. नेवाशाचा एक ओळखीचा माणूस होता. भावाच्या चेहऱ्याकडे पाहून त्याने अडचण विचारली. भावाने सांगितल्यावर लगेच एक रुपया काढून तो म्हणाला, "चला, चांगला योग आला. मी पण इकडेच आलो." भावाला हायसे वाटले आपला नेम चुकेल अशी भीती त्याला वाटत होती. तो म्हणाला, "साईबाबांनीच त्याला धाडले असेल." श्रीसाईंचे मूर्तिकडे पाहिले. ती प्रसन्न होती, आनंदी होती. हसल्यासारखी दिसत होती. डोळयात अश्रूंचे दोन थेंब उभे राहिले होते.

श्रीसाई आकाशाएवढे आहेत. गरीब, श्रीमंत, दीनदुबळे हे सर्व एकाच ठिकाणी असलेल्या धरतीला त्यांनी वात्सल्याचे, प्रेमाचे आवरण घातले आहे. श्रीसाईंचा तळपता अवतार सूर्यासारखा आहे. अनंत सूर्यकिरणांप्रमाणे त्यांचे अनंत हात आहेत. मुक्त हस्ताने ते प्रेम, जिव्हाळा, आत्मविश्वास, भक्ती, माणुसकी इत्यादी ह्या मानव- जातीला देत असतात. मानवजातीचे सौंदर्य नष्ट करणारी दुःखाची नदी ते सूर्या- प्रमाणे शोषून घेतात व दुःखाच्या वाफेचे सुखात रूपांतर करितात.

श्रीसाईनाथ चंद्रासारखे शीतल, शांत होते. ते ब्रह्मानंदी रंगलेले असायचे. ब्रह्मानंदी लागली टाळी। कोण देहाते सांभाळी ।। अशी त्यांची वृत्ती होती. श्रीसाई- बाबांमध्ये प्रत्येक जण सूर्य, चंद्र, आकाश, धरती पाहात होता. धरती व आकाश आणि यांमधील निसर्ग पोकळी साईमय झाली आहे.

त्यांच्या अवताराचा हा फार मोठा चमत्कार आहे. साक्षात्कार आहे. श्रीसाई म्हणाले होते, "ह्या मानवी रूपात जरी मी नसेन, तरी माझी समाधि व विभूती माझ्या भक्तांना पावन करील–त्यांचे रक्षण करील." मनोमन वाटते की श्रीसाई खरोखरच परमेश्वराचा अवतार आहेत. आपल्या समाधीनंतर देखील ते भक्तांची पूर्वीप्रमाणेच काळजी घेतात.

श्रीसाईंची वाणी गंगौघासारखी अमोघ होती. एकेक शब्द अमृताचा थेंब होता. तो नुसता चाखला की मानवाला नवजीवन प्राप्त होत असे. नवचैतन्य प्राप्त होत असे. 'मानवी दुःखाचे विष पिऊनी तू, साई। दिलेस सुख अपार ।। नानाविध रंगरूपे तुझी ही। अनेक साक्षात्कार वा अवतार ।।'

ज्या शिर्डीला बाबांचे पाय लागले त्या शिर्डीस येण्याचा योग मी औत्सुक्याने पाहात आहे. ज्या शिर्डीग्रामी माझे पाऊल लागले त्या शिर्डीच्या मातृभूमीला लक्ष लक्ष प्रणाम ! !

श्रद्धा आणि सबुरी असली म्हणजे श्रीसाई आपल्या भक्तांचे रक्षण करतात. श्रध्दा आणि सबुरी ह्यांचे प्राणपणाने जतन करून श्रीसाईंचे आशिर्वाद घेण्याचा आपण एक यशस्वी प्रयत्न करू या ! हे साईनाथा आम्हा पामरांना तशी बुध्दी दे !!

सदा–सर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ।
उपेक्षू नको गुणवंता अनंता ।
श्रीसाईनाथा मागणे हेचि आता ।।

☆

# श्री. बाजीराव कोते पाटील यांचे देहावसान

श्री. बाजीराव तात्याजी कोते पाटील यांचे मंगळवार दि. २९ एप्रिल ८० रोजी दुपारी १२–४४ वा, शिरडी येथे दुःखद निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ५९ वर्षाचे होते. गेले वर्ष-दीड वर्ष ते कर्करोगाने आजारी होते.

कै. बाजीरावांचे वडील तात्याबाबा कोते पाटील हे श्रीसाईबाबांचे कट्टर भक्त होते. त्यांचा विवाह श्रीसाईबाबांनीच लावून दिला होता. साई काळातील बायजाबाई या बाजीरावांच्या आजी होत. तात्याबाबांचे देहावसान १९२१ साली झाले होते.

कै. बाजीराव पाटील श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे काही काळ कार्यकारी विश्वस्त होते. संस्थानच्या सहकार्याने शिरडीस अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची शाखा त्यांनी काढली, तिचेच दृश्य स्वरूप म्हणजे शिरडीचे श्रीसाईनाथ विद्यालय होय.

बाजीरावांचे तृतीय पुत्र चि. दिलीप यांचा विवाह ४ मे ८० रोजी आयोजित करण्यात आला होता. शुभमंगल पत्रिकाही वाटण्यात आल्या होत्या. परंतु तो विवाह २८–२९ एप्रिल रोजीच व्हावा अशी इच्छा एकाएकी बाजीरावांनी प्रगट केली. उभयपक्षी धावपळ करून हा विवाह ता. २९ रोजीच शिरडीस त्यांच्या निवासस्थानी दुपारी ११–३० वा. पार पडला व लागलीच दुपारी १२–४४ वा. बाजीरावांची प्राणज्योत मालविली गेली.

श्रीसाईबाबा संस्थानतर्फे त्यांच्या शवास महावस्त्र अर्पण करण्यात येऊन शासकीय अधीक्षक श्री. द. चिं. पाठक यांनी श्रद्धांजली वाहिली. श्री. बाजीरावांचे मागे त्यांच्या पत्नी, तीन पुत्र, दोन विवाहित कन्यका, नातवंडे व असंख्य मित्र परिवार आहे.

**श्रीसाई मृतात्म्यास सद्‌गती देवो.**

# 'माझी साईभक्ती'

—श्री. आत्माराम लक्ष्मण साठे,
मु. पो. तारापूर, जि. ठाणे.
महाराष्ट्र राज्य.

* मी साईभक्त आहे सन १९५३ पासून. तेव्हा मी उत्तर गुजराथ–पाटण–या शहरी नोकरीस तेथे बदली झाली त्यामुळे होतो. त्यापूर्वी एकदाही 'बाबांचे चरित्र-ग्रंथाचे' ओझरतेही वाचन केले नव्हते. पण पाटणला माझे काही व्यवसाय बंधूंचे सहवासाने साईभक्तीला आकर्षित झालो. सन १९५७ मध्ये नोकरीतून निवृत्त झालो. पण खाजगी नोकरी करीत होतो. त्यावेळी माझे 'बाबांचे चरित्र ग्रंथाचे' एकदा ओसझरते वाचन झाले. त्याला कारण माझी पत्नी, सौभाग्यवती, तिने तो ग्रंथ वाचावयास आणला होता.

भक्ती म्हटली म्हणजे संत, भक्त, गुरु, भगवंत, यांचे गुणानुवाद गाणे, स्वतः त्यांचे अनुकरण करणे होय. देव, संत, भक्त हे सर्व जरी निराळे असले तरी ते एकरूपच होत. तेव्हा मी सुध्दा भक्त झालो म्हणजे त्यांच्याशी एकरूप होऊ लागलो. माझा काही कथा, पुराणे, शास्त्र, इतिहास यांचा अभ्यास नाही. परंतु '॥ ग्रंथ पाहता लक्ष कोटी । जेथे तेथे भक्ती मोठी ॥' हे तत्व मला पटले व भगवंत, संत, भक्त, साधू, महंत यांनी दाखविलेल्या मार्गाने भक्तीपंथाने जावे असा माझा जीवन प्रवाह सुरू झाला. चरितार्थासाठी काही उद्योग म्हणजे कर्म करीत असताना, थोडे ज्ञान संपादन करणे व नामस्मरण, सर्वाभूती भगवंत पाहाणे असा माझे मनाला छंद लागला. जगात अनेक धर्म आहेत. त्या सर्व धर्मांचे सार एकच–त्या जगन्नाय-काला भजणे, हे मला पटले व 'श्रीसाई बाबांचे'कडे सर्व धर्माचे भक्त आकर्षिले गेले हे पाहून मला 'बाबा' 'भक्तीचा गाभा' असेच वाटू लागले. योगायोग असा की मला शिरडीला जाण्याचा योगही आला व हा योग म्हणजे एक आकस्मिक संधी. काही कारणास्तव नाशिक क्षेत्री गेलो व तेथून 'बाबांचे प्रेरणेनेच' शिरडी क्षेत्री गेलो. श्रीरामनमी उत्सव संपून यात्रा ओसरली होती. बाबांचे दर्शन करून आलो तेव्हा-पासून त्यांचे नित्य स्मरण करतो. 'बाबा' म्हणजे मला 'भक्ती गंगाच' वाटते. त्याबद्दल मी एक 'अष्टक' रचले. ते 'बाबांचेच कृपा स्फूर्तीने. हे 'अष्टक' खालील प्रमाणे:— ॥'भक्तीगंगा' श्रीसाई रुपीं । प्रगट झाली शिरडीहून । भक्त जनांना पावन करण्या । सत्संग–वीणा हाती घेऊन ॥ ध्रु० ॥ श्री'साईबबा' शिवस्वरुपी । भोळ्या भक्तांना पावती । जन्म मरण याता-याती चुकविती । जे शरण जाती ॥ १ ॥

शरण जाती त्यांना देती । अक्षय संसारी आनंद । मंदिरी ती शांत मूर्ती । भक्तीगंगा सुखकंद ॥२॥ भक्ती-गंगा काय देते ? । देते सर्व काही भक्तां । देह क्षेत्र पावन करूनी । पूर आणिते ब्रम्हानंदा ॥ ३ ॥ ब्रम्हानंदाचा आनंद । भक्ती-गंगा श्रीसाईनाथ । पावन व्हा हो पावन व्हा हो । जड जीवा समवेत ॥ ४ ॥ सत्संग वीणा धरा हाती । तार छेडा राम नामे । रामकृष्ण हरी रामकृष्ण हरी । रामकृष्ण हरी बोला वाचे ॥५॥ 'भक्ती-गंगेत' करा स्नान । करा मज्जन अवगाहन । हर गंगे बोला गोदावरी । ॐसद्गुरु श्रीसाईनाथ ॥ ६ ॥ ॐसद्गुरु श्रीसाईनाथ । ॐसद्गुरु श्रीसाईनाथ । ॐसद्गुरु श्रीसाईनाथ । भक्ती-गंगा' ही नित्य वाहात ॥ ७ ॥ हे अष्टक म्हणावे नित्य । रोज अथवा एक पाठ । 'निजानंद' सांगे नित्य सत्य । कृपा करातील 'श्रीसाईनाथ' ॥ ८ ॥ श्रीसद्गुरु साईनाथार्पणमस्तु ॥ (कवि-निजानंद) म्हणजेच आत्माराम लक्ष्मण साठे.

वरप्रमाणे माझे 'भक्ती-गंगाष्टक' जे त्यांचे ( बाबांचेच ) कृपेने रचून झाले ते मला रोज 'बाबांचे' स्मरण करण्याकामी एक अजोड साधन झाले आहे. रोजचा जीवनकार्यक्रम चालतोच. पण जेव्हा विश्रांती असते तेव्हा मला 'बाबांचे' स्मरण या 'भक्तीगंगाष्टकाने' होते. राम, कृष्ण, शंकर, गणपती, देवी, मारुती, या सर्वांचे स्मरण, चिन्तन करावे, त्याचबरोबर 'बाबांचे' स्मरण, चिन्तन करावे हा माझे मनाला एक छंदच जडला. जीवनात संकटे येतात, जातात. हा सर्व जीवनक्रम त्या भगवंताचेच लीला कौतुक होय. जगत् चालना त्या भगवन्ताचीच. मी एकदा भगवंताला भक्तीयोगाने भेटू लागल्यापासून देहाचा चालक तोच ही भावना दृढ झालेली. अचानक 'श्रीसाईलीला' मासिकाचा एक अंक मला हाती येऊन वाचण्यास मिळावा. व तो अंक वाचल्यानंतर जानेवारी पासून एक वर्षाची वर्गणी पाठवून मी ग्राहक-वाचक झालो. भक्तीमुळे एकंदर माझे जीवन सुखदुःखांकडे विन्मुख झाले. कारण ही सुखदुःखे अनित्य आहेत ही जाणीव झाली. नित्यशाश्वत जर काही असेल तर ते भगवंतभक्तीचेच सुख होय. या सुखाला दुसरी जोड नाही असे हे सुख आहे मग ते आपण का न मिळवावे ? अर्थात् जरुर मिळवावे.

भगवंत, संत, साधू, महंत, गुरु हे कल्पवृक्ष, कामधेनू, चिंतामणी आहेत. आपली मनकामना, आपले मनोरथ, आपले या जगातील हेतू पूर्ण करणारे-भगवंत अवतार घेतात त्याचे कारण त्याचे भक्त. तो भक्तांसाठी अवतार घेतो. अवतार घेणे त्याला प्राप्तच होते. कारण भक्तांची संकटे दूर करणे. भक्तांना त्यांचे भक्ती-मार्गात मार्गदर्शन करणे, हा भगवंताचा स्वभावच आहे. भक्त हा भक्ती साधना करतो. म्हणजे साधक बनतो. त्याला सिद्ध होता येते. आणि तो सिद्ध झाला म्हणजे भगवंत स्वरूपच बनतो. भगवंत त्याला स्वस्वरूपी लीन करतो.

एक जपी, तपी ब्राह्मण-जप तप करतो. त्याची तप साधना पुरी झाली. विष्णु-पत्नी लक्ष्मी अंतर्ज्ञानाने जाणते की–हा भक्त आता विष्णुपद घेईल इतकी तपसाधना त्याची झाली आहे. विष्णु भगवंताचे पादसेवन करीत असताना लक्ष्मी त्यांना सांगते, 'भगवंत एक तपस्वी तपसाधना पुरी करून विष्णुपद घेईल इतकी त्याची तपसाधना पुरी झाली आहे. तरी त्याला दर्शन देऊन कृतार्थ करा.' लक्ष्मीला हा तपस्वी आपल्या पतीचे स्थान घेईल ही काळजी वाटू लागली. भगवंत विष्णु श्री लक्ष्मीने वरीलप्रमाणे सांगितल्यामुळे 'भक्त रक्षण हा ज्याचा बाणा' ते तावडतोब उठले. पायी पावा घातल्या आणि त्या तपस्व्यासमोर येऊन उभे राहिले व त्याला म्हणाले, 'बाबारे, एवढे तप का करीत आहेस ?' तपस्वी म्हणतो, 'श्री विष्णू भगवंत भेट व्हावी म्हणून.' भगवंत म्हणतात, 'श्री विष्णू तो मीच.' तपस्वी श्री विष्णूचे पाय धरतो. भगवंत म्हणतात, 'मी प्रसन्न आहे इच्छित माग.' तपस्वी म्हणतो, 'मला राज्य नको. धन नको. दौलत नको. श्री विष्णूभक्ती अखंड, दृढ व्हावी. हा जन्म संपताच मला वैकुंठास–श्री विष्णूपदी विलीन होता यावे.' श्री विष्णू भगवान् 'तथास्तु' वर देऊन अंतर्धान पावले. तपस्वी त्याचा जन्म संपताच वैकुंठास जाऊन श्री विष्णूपदी विलीन झाला. तात्पर्य–जशी भक्ती-तसे फळ. हा तपस्वी शाश्वत सुख कोणते, त्याचे ज्ञान झाल्यामुळे हे शाश्वत सुख प्राप्त करू शकला.

माझी 'साईभक्ती' पण याच स्वरूपाची आहे. परंतु तिची कक्षा मात्र अद्याप वरील तपस्व्यासारखी नाही हे मी निश्चित समजतो. तरी सुद्धा ध्येय-भक्तीचे ते साध्य या जन्मी नाही झाले तरी या साईभक्तीचे फळ चांगले मिळणार. परंतु षड्रिपु, षड्-विकार, त्रिविध ताप हे कोणत्या मानवाला सोडतात ? देवादिकाना सुद्धा हे 'त्राहित्राहि' करतात. मग माझेसारख्या सामान्यातील सामान्य माणसाला ते काय सोडणार आहेत ! तरी पण परमेश्वरभक्तीमुळे, तसेच 'साई' भक्तीमुळे जे काही क्षण भक्तीत जातात त्याचे महत्त्व फारच आहे, असा माझा दृढ विश्वास आहे. ज्याप्रमाणे उपवासी जीवाला जरी काही थोडे अन्नकण मिळाले तरी त्याचे प्राणांचे रक्षण होते, तहानलेल्या जीवाला काही थोडे जलकण मिळाले तरी त्याचे प्राणांचे रक्षण होते, त्याप्रमाणे भक्तीमध्ये जे काही अल्प क्षण ज्याचे जातात त्याला परमेश्वर, 'साईबाबा' भक्तीप्रदान करतात.

'श्रीकृष्ण भगवान' गोपगोपींजवळ अनेक लीला, खेळ खेळले. ती 'प्रेमभक्ती' 'प्रेमलक्षणा भक्ती' गोपगोपी श्रीकृष्ण भगवंताशी' एकरूप झालेल्या होत्या. हीच ती पराकोटीची भक्ती. संत 'मीरा' या पराकोटी भक्तीच्याच कक्षेतील होय. विष-प्राशन करून तिने मृत्युमुखी न पडता जीवंत राहणे याचे कारण भक्त स्वयं भगवानच

होतो. ती परमेश्वरी शक्ती या पराकोटीच्या भक्ताला प्राप्त होते. गोप गोपी समवेत श्रीकृष्ण लीला करतात-खेळतात असे दृश्य, असा अनुभव अजून सांप्रतही मथुरा गोकुळ वृन्दावनात भक्तांना येतो. याचप्रमाणे आम्हा भक्तांना 'बाबांचे दृढ पराकोटीचे भक्ती प्रेमामुळेच भेट सगुण रुपाने होते. यात जगाला काही अशक्य वाटण्यासारखे नाही. फक्त अज्ञानामुळे, नास्तिक भावामुळे त्यांना ते अशक्य वाटते. माझा तर असा अनुभव आहे की, आपण जे जे दैवत भजतो, आवाहन करतो, ते ते आपल्याला भेटू शकते. मग 'बाबा' आमचे 'दैवाने' ते आम्हास त्यांना भजता, आवाहन करता, भेटतातच भेटतात. कारण भगवंताचे राहण्याचे ठिकाण 'अंतःकरण' 'जगतांमाजी जितुकी शरीरे। तितुकी ती भगवंताचीच मंदिरे॥ अशी या मानव देहाची अपूर्वता आहे. इच्छामात्रे तो आपल्या देहातच राहतो आणि हीच 'ब्रह्म प्राप्ती'. असे ब्रम्ह 'बाबा' होत. ते आम्हास भेटते.

माझी साईभक्ती अद्वैत भावनारूपी आहे. देव, संत, भक्त, महंत, गुरु, महात्मा हे सर्व देव कोटीतीलच होत. कारण असे आहे की-'देवापोटी संत वसे। भक्ता पोटी देव असे। ऐसा परस्परे मेळा। देव भक्तांचा अंकिला॥ याच न्यायाने माझी देव व संत, भक्त इ. यांचे विषयी द्वैत भावनाच नाही. भक्तीभावच पाहिजे. भगवंत हा सर्वांचा सांभाळ करतो. गोब्राम्हणप्रतिपालक असा तो आहे. माझी पण तशी श्रद्धा, भाव, विश्वास आहे. तसेच तो जातपात पहात नाही. त्याला सर्वांशी समभावच वाटतो. त्याचप्रमाणे 'बाबांची' दृष्टी होती. ते अंतर्ज्ञानी होते.

माझी 'साईभक्ती' परमेश्वरभक्ती अखंड व्हावी हीच त्यांना या क्षणी प्रार्थना.

---

# नांदा सौख्यभरे

## देशपांडे-दिवाकर शुभमंगल

● श्रीसाईबाबा संस्थानच्या शिरडीच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री. प्रकाश देशपांडे यांची भगिनी व श्री. प्रभाकरपंत देशपांडे यांची ज्येष्ठ कन्या चि. सौ. कां. मीना हिचा विवाह श्री. प्रमोद दिवाकर पुणे यांजबरोबर सोमवार ता. २८ एप्रिल रोजी शिरडीत थाटाने पार पडला.

× × × ×

## नागपुरे-हेडाऊ शुभमंगल

श्रीसाईबाबा संस्थानच्या शिर्डी येथील लेखा विभागाचे भूतपूर्व प्रमुख लेखापाल श्री. शांताराम तथा भाऊसाहेब नागपुरे यांची कन्या चि. सौ. कां सावित्रा हिचा विवाह चि. सुहास हेडाऊ, मुंबई यांजबरोबर दि. ४ मे रोजी शिरडी येथे थाटाने पार पडला.

# " साई–तारी–त्याला–कोण मारी "

—श्री. विजय काशिदास मेहता
बालाजी मंदिरासमोर, शिवाजी चौक,
मु. पो. ता. महाड ( कुलाबा )

मी ता. २०–१२–१९७८ रोजी माणगाव येथे स्टेट बँकेत लागून माझा मेडिकल रिपोर्ट चांगला येऊन साई कृपने ता. २६–१२–१९७८ रोजी सहा महिन्यासाठी प्रोबेशनवर लागलो. मला सहा महीने ता. २६–६–१९७९ रोजी पूर्ण होऊन बँकेत कायम होणार होतो. परंतु दुर्दैवाने ता. १७–६–१९७९ रोजी आमचेकडे पूजा असल्याने मी फुले काढण्यास झाडावर चढलो असताना जवळ-जवळ १५–२० फुटावरून फांदी मोडल्यामुळे खाली पडलो; परंतु साईकृपेने एवढ्या उंचीवरून पडून सुद्धा फक्त माझ्या उजव्या पायाच्या तळव्याला मार ( दुखापत ) लागला. लगेच हॉस्पिटलमध्ये जाऊन एक्स रे काढला असता डॉक्टरांनी सांगितले की एक महिना विश्रांती घ्यावी लागेल. तेव्हा साईबाबांना नवस ठेवला की, जर मी बँकेत कायम झालो व १८–७–१९७९ रोजी पाय बरा होऊन बँकेत हजर झालो तर माझा हा अनुभव **"साईलीलेत"** प्रसिद्ध करण्यास पाठवीन. त्याप्रमाणे मी ता. २६–७–१९७९ पासून बँकेत कायम झालो व ता. १८–७–१९७९ रोजी साईबाबांच्या कृपेने पाय बरा होऊन बँकेत हजर झालो. तसेच मी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीस येईन त्याप्रमाणे लौकरच शिर्डी येथे जाऊन आलो.

मी बँकेत नोकरी करण्याअगोदर ठाणा येथे एका कंपनीत नोकरी करीत असताना त्या कंपनीत मी रु. ५००/– ठेव ठेवली होती परंतु नोकरी सोडल्यानंतर कंपनी मला माझी ठेव रु. ५००/– देण्यास तयार नव्हती. तेव्हा मी साईबाबांना नवस ठेवला की माझे ५००/– रु. मला परत मिळाले तर मी तुमच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येईन. त्याप्रमाणे थोड्याच दिवसात कंपनीने मला माझी ठेव रु. ५००/- दिले. त्याप्रमाणे मी लगेच शिर्डी येथे जाऊन साईबाबांचे दर्शन सुद्धा घेऊन आलो. अशा प्रकारे मला साईबाबांनी एक ना अनेक प्रकारे अनुभव देऊन संकटातून सोडविण्यास मदत केली आहे. जर माझी स्टेट बँकेतील नोकरी गेली असती तर माझ्या घराची काय वाताहात झाली असती, याची कल्पनाच करवत नाही. कारण मीच घरात मोठा असल्याने सर्व प्रकारची जबाबदारी माझेवरच आहे. परंतु मी व आमच्या घरातील आई, वडील साईबाबांचे निस्सीम भक्त असल्याने साईबाबांनी तसे घडूच दिले नाही.

या माझ्या वरील दोन अनुभवरून "खरंच बाबांची लीला अगाध आहे त्याला अंत नाही. हे म्हणतात ते खोटे नाही" बाबा म्हणतात मी शरीर टाकून गेलो तरी भक्ताने मारलेल्या हाकेला मी केव्हाही धावून येईन त्याप्रमाणे बाबा खरोखरच धावून येतात. व पुढे केव्हाही धावून येतीलच. आपल्या भारतात पुष्कळ संत होऊन गेले परंतु साईबाबांसारखे संत निराळेच. ज्याला जे पाहीजे, हवे त्याला ते देणारे इतकेच नव्हे तर मृत्यूच्या जबड्यातून हयातीतच नाही तर हयातीनंतर सुद्धा आपल्या उदीने आपल्या भक्ताना संकटातून सोडविणारे, श्रीसाईबाबांसारखे संत पृथ्वीतलावर निर्माण झाले हे भारताचे खरोखरच भाग्य म्हणावे लागेल.


# साईलीला मासिक जाहीरात दर

साईलीला मासिकात (इंग्रजी-मराठी) छापले जाणारे जाहीरातीसाठी खालील प्रमाणे दर एप्रिल ८० पासून आकारण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) मलपृष्ठ २, ३ व ४ | पूर्णपान | रु. १००-०० |
| २) आतील मजकूराचे | पूर्णपान | रु. ७५-०० |
| ३) आतील मजकूराचे | अर्ध पान | रु. ४०-०० |

जाहिराती सलग ६ महिन्यासाठीही स्वीकारल्या जातील.

क. हि. काकरे

कोर्टरिसिव्हर

# एक अपूर्व यश.

## कु. सुगंधा व्ही. कौंडिण्य

(लेखक–श्री. द. चिं. पाठक, शासकीय अधीक्षक, श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी)



आमचे येथील श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालयात शिक्षक म्हणून काम करणारे श्री. व्ही. व्ही. कौंडिण्य यांची साईभक्त कन्या कु. सुगंधा व्ही. कौंडिण्य हिला भारत सरकारची सांस्कृतीक शिष्यवृत्ती मिळाली. ही शिष्यवृत्ती तिला नाट्यप्रशिक्षणासाठी मिळाली. महाराष्ट्रातून अशा प्रकारे शिष्यवृत्ती मिळविणारी कु. सुगंधा कौंडिण्य ही एकमेव विद्यार्थिनी होय. भारत सरकारने तिला दरवर्षी १२०० रु. व फी म्हणून १००० रु. अशी शिष्यवृत्ती दिली. कु. सुगंधा कौंडिण्य हिचा बालरंगभूमीवरील अभिनय अप्रतिम असतो. सध्या ती नगर येथील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल मध्ये इ. ८ वी मध्ये शिकत आहे. "न रडणारी राजकन्या" ह्या जयंत तारे लिखित बालनाट्यात राजकन्येच्या भूमिकेत प्रेक्षकांनी तिच्याविषयी आनंदोद्‌गार काढले. केवळ नाटकातच ती यश मिळविते असे नाही तर जिल्हा पातळीवर घेण्यात आलेल्या वक्तृत्व व निबंध स्पर्धेत तिने बरीच पारितोषिके मिळविलेली आहेत. गतसाली श्रीसाईबाबा ६१ वी पुण्यतिथी-निमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धामध्ये तिला क्रं–२ चे ५१ रु. पारितोषिक मिळाले. हा निबंध याच अंकात इतरत्र प्रसिद्ध केला आहे. "ज्ञानांकूर" निबंध स्पर्धेत लागोपाठ दोन वर्षे तिने प्रथम क्रमांक मिळविला तर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत ती चमकली. खेळांमधील तिचे यश नजरेत भरण्यासारखे असते तर अभ्यासातही ती उत्तम गुण मिळविते.

"मला सदरचे यश गुरुंचे मार्गदर्शन, माझे प्रयत्न व श्रीसाईबाबांचे शुभाशिर्वाद पाठीशी असल्यानेच मिळत असते" असे ती नम्रपणे सांगते. तिच्या ह्या अभूतपूर्व यशानिमित्त श्रीसाईनाथ शिर्डी संस्थान तर्फे तिचे सहर्ष अभिनंदन.

☆ ☆ ☆

# प्रा. द. दि. परचुरे यांना श्रद्धांजली.



ह्या मासिकाचे भूतपूर्व कार्यकारी संपादक प्रा. द. दि. परचुरे यांस दि. १ जून १९७३ ला सकाळी हृदयविकाराचा झटका आला व त्यातच त्यांचा दुःखद अंत झाला. वस्तुतः प्रा. परचुरे ह्यांचा अभ्यासाचा व शिकविण्याचा विषय गणित; परंतु त्यांना गणित विषयाबरोबरच इंग्रजी, मराठी व हिंदी ह्या तीनही भाषांतील वाङ्मयाची गोडी. त्यातल्यात्यात त्यांन अध्यात्माबद्दल विशेष आवड. ह्या त्यांच्या आवडी· मुळेच कॉलेजातील अध्यापनाबरोबरच ते आध्यात्मिक विषयांवर व्याख्याने देत व प्रवचनेही करीत. तसेच त्यांनी कीर्तनाचाही अभ्यास केला व ते कीर्तनेही करू लागले. भिवपुरीच्या साई मंदिरात दसरा व रामनवमी ह्या दिवशी ते आवर्जून उपस्थित राहून कीर्तने करीत असत.

अध्यात्माच्या नैसर्गिक गोडीमुळेच प्रा. परचुरे साईबाबांच्याकडे आकृष्ट झाले व माजी कोर्ट रिसीव्हर श्री. पाठकसाहेब ह्यांच्या विनंतिवरून त्यांनी साईलीला मासिकाचे संपादकपद स्वीकारले. प्रा. परचुरे ह्यांच्या अभ्यासू वृत्तीमुळे साईलीला मासिक अधिक लोकप्रिय करण्यासाठी त्यात काय सुधारणा कराव्यात ह्याचा सतत विचार करून त्यांनी इंग्रजी व मराठी अंक एक एप्रिल १९७३ पासून स्वतंत्र केले. ह्यामुळे दोन्ही भाषिकांना समाधान लाभले व साईभक्तीच्या प्रसाराबरोबरच आज सात वर्षानंतर दोनही मासिकांचा खप १९७३ च्या खपापेक्षा चौपटीहून अधिक झाला आहे.

साईसच्चरित्राच्या सप्ताहाचे कार्यक्रमहि ठिकठिकाणी होऊ लागले आहेत. त्याठिकाणी कीर्तनाचे कार्यक्रमही करावे असे कार्यकर्त्यांच्या मनात येई, परंतु दासगणु स्वतः साईचरित्रावर रसाळ कीर्तने करीत असले तरी त्यांची कीर्तने लिखितस्वरूपात उपलब्ध नसल्यामुळे ही उणीव सतत भासत राहिली. ती लक्षात घेऊन प्रा. परचुरे ह्यांनी साईचरित्रावर एक आठ कीर्तनांची माला लिहिली व ती शिर्डी संस्थानाने "साई कीर्तनमाला" ह्या नावे प्रसिद्धही केली आहे. साईबाबांच्या चरित्रावर कीर्तने करू इच्छिणाऱ्या कीर्तनकारांची ह्यामुळे फारच चांगली सोय झाली आहे.

श्रीसाईबाबांच्या चरित्राचा प्रसार लहान मुलांत व्हावा ह्या दृष्टीने प्रा. परचुरे ह्यांनी लहान मुलांसाठी अत्यंत सोप्या व आकर्षक भाषेत श्रीसाईबाबांचे चरित्र "मुलांचे साईबाबा" ह्या नावाने गोष्टीरूप स्वरूपात लिहिले. मराठी प्रमाणेच त्यांनी ते चरित्र इंग्रजी भाषेतही लिहिले आहे. आता अन्य भारतीय भाषांतही ह्या चरित्राचे अनुवाद होत आहेत आणि थोडक्याच काळात ते चरित्र सर्व भारतीय भाषात प्रकाशित होईल असे वाटते. मराठी, इंग्रजी, हिंदी इत्यादि भाषेतील ह्या चरित्राच्या आवृत्त्यावर आवृत्त्या निघत आहेत. त्यामुळे साईभक्तीचे मूळ लहान मुलांच्या मनात बाळपणापासूनच धरू लागलेले आहे.

ह्या मासिकाचे माजी कार्यकारी संपादक व थोर साईभक्त प्रा. द. दि. परचुरे ह्यांना त्यांच्या साईभक्तीच्या प्रसारार्थ केलेल्या महान कार्याबद्दल, त्यांच्या सातव्या श्राद्धदिनी (दि. १-६-८०) श्रीसाईलीला मासिकातर्फे आमची भावपूर्ण श्रद्धांजलि आम्ही अर्पण करीत आहोत.

—संपादक.

★

## श्रीमती टिपणीस यांचे निधन

साईभक्त कै. द. शं. टिपणीस यांच्या पत्नी श्रीमती प्रमिला टिपणीस यांचे ठाणे मुक्कामी रवि. ता. ११ मे रोजी सकाळी ११-४० वा. निधन झाले. त्यांचे वय ६६ वर्षांचे होते. गतसाली याच महिन्यात त्यांचे पती साई-चरणी विलीन झाले होते.

# मी शिरडीला काय पाहिले !

—कु. सुगंधा कौंडिण्य
भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, अहमदनगर.

...तशी मी सहलीच्या निमित्ताने व आईवडिलांबरोबर दोन-तीन वेळा भारतातील पुण्यक्षेत्र म्हणून नावाजलेल्या शिरडीस आले. श्रीसंत चूडामणी सच्चिदानंद साईबाबांच्या आगमनाने नी वास्तव्याने पवित्र झालेल्या शिरडी गावाचं—संस्थानचं पावित्र्याची जमीन मी पाहिली. ह्या पुण्यप्रद क्षेत्राचं लहान वयातच मला दर्शन व्हावं ह्यासम दुसरा योग आणखी कोणता ?

मी श्रीसाईबाबांवरील काही पुस्तके लहानपणीच वाचली. माझे सर्व नातेवाईक साईभक्त असल्याने बाबांच्या विषयी मला विलक्षण भक्ती आहे. म्हणूनच शिरडीला संधी मिळताच मी जाते. कारण तेथे मला दर्शन घडते ते परमेश्वराचे, परमानंदाचे ! ...खरं सांगू देव कसा हे मला ठाऊक नाही पण जेथे जेथे आनंदमय... मांगल्य... पावित्र्याचं वातावरण असतं, तेथे तेथे देव असावा हीच माझी बालकल्पना ! म्हणूनच मला शिरडीला गेल्यावर जो आनंद मिळतो तो शब्दांनी व्यक्त करताच येणार नाही.

मी शिरडीला येताक्षणी प्रथम पहाते ते खंडेरायाचे मंदीर...ज्या मंदीरातील साईभक्त म्हाळसापतीनी एका मिसरूड सुद्धा न फुटलेल्या तरूणाला बोलावून "आवो साई" म्हटले ते ठिकाण ! बाबा प्रथम येथे आले. श्रीबाबा कोठून आले ? त्यांचा जन्म कोठला ? हे कोणीच सांगू शकत नाही. कारण परमेश्वराचा जन्म होतो कसा ? हे कोणी सांगेल का ? बाबांचे प्रथम पाऊल ज्या ठिकाणी लागले, ते खंडे-रायाचे मंदीर दिसल्याबरोबर श्रीसाईबाबा मंदिरा समोर कसे उभे राहिले असतील ह्याची मी मनोमनी कल्पना करते...हां...हां...म्हणतां माझ्यासमोर तेजःपुंज... परमेश्वर स्वरूप श्रीसाईबाबांचे दर्शन सहज घडू लागते...बाबा दीनदलीतांवर प्रेम करायचे...त्यांच्या उदी-विभूतीने दुर्धर रोग दूर व्हायचे म्हणूनच खंडेरायांच्या शेजारी त्यांचे पहिले स्मारक श्रीसाईनाथ हॉस्पीटल पाहिले की बाबांच्या आशीर्वादाने येथे येणारे रोगी पुन्हा मृत्यूच्या दाढेतून ओढले जात असतील. बाबांच्या समर्थ भक्तीने भक्त तारले जातात. ह्या दवाखान्यात विज्ञान नी अध्यात्म एकाचवेळी हातात हात घालून नांदताना मला दिसले. बाबांना शिक्षणाची आवड. मुलांना शिक्षणासाठी शाळा असावी म्हणून त्यांनी आपली इच्छा नेहमीच प्रकट केली. हॉस्पीटलच्या शेजारी असलेले श्रीसाईनाथ ज्ञानमंदीर उभारून बाबांच्या प्रेरणेने असंख्य शिष्यगण आपल्या गुरुजनांच्या ज्ञानाचा लाभ घेताना मला दिसले...बाहेरच्या पटांगणावर गुजरात, केरळ, राजस्थान, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र वगैरे राज्यांच्या प्रवासी बसेस उभ्या

होत्या. भारतातील निरनिराळ्या राज्यांतून भक्तगण बाबांच्या दर्शनासाठी आले होते. आम्ही जरी वेगवेगळया राज्यांचे असलो तरी शेवटी भारत माझा देश आहे, व म्हणूनच बाबांच्या क्षेत्री हे सर्व एकच होते. बाबांच्या शिकवणीमुळे सारेजण एकत्र नांदताना दिसले. ग्रामपंचायतीच्या परिसरात साऱ्या गाड्या उभ्या होत्या. जणू भारताचा नकाशाच तयार झालेला दिसला...

...फुलांच्या विविध हारांनी खच्चून भरलेल्या दुतर्फा दुकानामधून जाताना मनातून अत्यंत आनंद झालेला होता. ओढ होती बाबांच्या दर्शनाची. असंख्य भक्तांची गर्दी–पण साऱ्यांच्या चेहेऱ्यावर बाबांच्या दर्शनासाठी आल्यामुळे नम्रता पसरलेली दिसली. निवांतपणे दर्शन घ्यावे ह्या हेतूने मी आजूबाजूस पाहू लागले...

...'लेंडी बाग'! ज्या ठिकाणी बाबा योगसाधना करायचे! किती रमणीय ठिकाण! चिमुकली हरणाची पिलं! चिमुकले पांढरे शुभ्र ससे! मोर...ह्यांच्याकडे पाहिले की जीवनातील सारे दुःख विसरावे. क्रूर प्राणी बागेत दिसतच नव्हता! बाबांनी हेच सांगितले असावे, की दुर्बल पण चपळ नी मोहक–प्राण्यांचं संरक्षण केलं पाहिजे! शक्तीचे–प्रदर्शन नको म्हणूनच वाघ, सिंह बागेत नव्हते! पाने...फळे... फुलांनी डवरलेल्या बागेत मध्यभागी एक जळत आहे नंदादीप! अश्वत्थ वृक्षाच्या छायेखाली अपार दया दाखवणारा नंदादीप बाबांनी लावला तो अजूनही तसाच! बाबांनी ज्योत पेटवली! मन उचंबळून येतं!...

साईभक्तांसाठी बांधलेल्या प्रचंड निवासाचे दर्शन होते ते पहात पहात मी बाबांच्या गुरूच्या समाधीकडे गेले..."मंदिर हे विश्रांतीचे स्थान असल्यामुळे त्याचे पावित्र्य राखणे आपले कर्तव्य" ही पाटी नसती तरी सर्वांनी त्या जागेचे पावित्र्य नक्कीच राखले असते....त्या निंबाच्या झाडाखाली बाबा गुरु सेवेसाठी बसत.... म्हणतात त्याची पाने गोड! बाबांच्या स्पर्शाने सारे गोड होते म्हणे!...

...मी मंदिराच्या पायऱ्या चढू लागले...फुलांनी भरलेली ओंजळ. शांतपणे पावलं टाकीत भक्त आत जात आहेत...पूजा साहित्याची थाळी घेऊन ललना देवदर्शनाला जात आहेत...साऱ्यांच्या नजरा अधीर झालेल्या आहेत...बाबांचे दर्शन घेऊन दुःख दूर करून घेण्यासाठी सर्वांची धडपड मला दिसली... मंदिराबाहेरील असंख्य भक्तगणात मी सामील झाले. माझे आईवडील बरोबर होतेच! पूजासाहित्य आम्ही घेतले होते...सकाळची आरती होत होती...खड्या आवाजातील पुजाऱ्यांची ती आरती! टाळ्यांचा नादमधुर आवाज! सनई...चौघडा वाद्ये वाजत होती! समोर डाव्या पायावर उजवा पाय! उजव्या पायाच्या पावलांवर डावा हात! कफनी! शाल! डोक्याला रेशमी वस्त्र! गळयात फुलांची माळ!

दया, क्षमा, शांतीची ती बाबांची भव्य मूर्ती पहाताक्षणी माझ्या डोळयात आसवं तरारली! आरती चालू होती! मंत्र पुष्पांजली झाली! बाबांचे स्तवन झाले! मी बाबांचे दर्शन अगदी जवळून घ्यावे म्हणून धडपडू लागले.! पण शिस्तीने दर्शन सर्व भक्त घेत होते...मी जसजशी जवळ जाऊ लागले, तसतसे मन धडधडू लागले! का? समजलेच नाही...पण मी जवळ गेले...बाबांच्या खूपच जवळ! हात जोडून उभी राहिले....

"जरी बाबा गेले शरीर टाकून
तरी समाधी मंदिरी असती अजून"

असाच मला भास झाला...पुजारीबाबा मला शांतपणे म्हणाले, "बेटा... प्रसाद घे!" मी जागी झाले...प्रसाद घेतला...हसून त्यांनी मला बाबांच्या डोक्यावरील फूल प्रसाद म्हणून दिले...आई-दादा पूजेचे साहित्य अर्पण करीत होते...आम्ही बाहेर पडलो...शरीराने...पण मन मात्र तेथेच रेंगाळत होते.

...पुन्हा दुसऱ्या दरवाजाने मी प्रवेश केला...बाबांनी वापरलेल्या वस्तू पहाताक्षणी हृदयात कालवाकालव झाली...एकेक वस्तू मी न्याहळू लागले...ज्यांनी बाबांना पाहिले...त्यांची सेवा केली त्या भक्तांचे फोटो बाबांच्या दरबारी लावलेले मी पाहिले ...बाहेर आले...आईने हाक मारली नी आम्ही द्वारकामाई मंदिरात शिरलो...ज्या शिळेवर बाबा बसत ती शिळा पाहिली. हात लावावासा वाटला. पण त्या पवित्र वास्तूला हात लावताना थरथरला...डोके टेकवून मी उठले...बाबा ज्या खांबाला टेकून बसत व ज्या चुलीवर दीनदलीतांसाठी अन्न शिजवीत ती पाहिली...व मनोमन बाबा चुलीशेजारी बसून हंड्यातील खिचडी तयार करताना कसे उभे असतील याचे चित्र रंगवू लागले...

बाबांची अक्षय धूनी पहाण्याची ओढ मला लागली. ज्यामधून संजीवनी उदी बाहेर पडते ते ठिकाण पाहू लागले. धगधगत्या ज्वालामधून, बाबांनी पेटवलेल्या धूनीतून बाबांचे दर्शन होवू लागले...आपल्या हाताने पावन केलेले जाते नी पोते पाहिले...बाबांची छबी...माठ, भांडे पाहिले. त्या पवित्र वास्तूत बाबांचे दर्शन ठायी-ठायी घडू लागले. शांत, प्रसन्न वातावरणातून बाहेर पडावेसे वाटत नव्हते. चावडी-मध्ये गेल्यावर त्या भव्य फोटोचे दर्शन घेऊन मन तृप्तावले! ह्याच ठिकाणी बाबा न्यायनिवाडा करीत!...रामभक्त हनुमान, गणपती, शनी, शंकर या देवतांच्या मंदिराचे दर्शन घेतले व समोरील वाचनालयात प्रवेश केला...बाबांच्या जीवनावरील

ग्रंथ, निरनिराळे फोटो पाहिले...आईने काही पुस्तके घेतली. मी बाबांची स्मृती म्हणून फोटो घेतले...पण मनातच एवढी स्मृती पक्की झाली की काही भानच रहात नाही ! प्रचंड धर्मशाळा पाहिली...उत्कृष्ट व्यवस्थेचे एक ठिकाण. एवढ्या शब्दातच वर्णन पुरे !...भूक लागली पोटाला म्हणून साई भोजनालयात गेले...पण मनाची भूक भागेना ! बाबांच्या दर्शनाने मनाचे समाधान झाले पण बाबा प्रत्यक्ष भेटले तर ह्याच विचारांनी मनात गर्दी केली. भोजनानंतर बाबांच्या हातच्या विहीरीचे पाणी प्यायले. तृप्त झाले...

...पुन्हा एकवार बाबांच्या मंदिराचे दर्शन घेतले...आकाशाला हात देण्या-साठी उंचावलेल्या कळसाकडे पहात मी बाबांच्या चमत्कारांविषयी विचार करीत होते. असंख्य भक्त ये जा करीत होते. सर्व धर्माचे, सर्व जातीचे भक्त बाबांपुढे नतमस्तक होताना मी पाहिले.

मी शिरडीला पाहिला भक्तांचा सोहळा, दया भक्तीचा पुतळा, मांगल्याचा ळळा, माझे मन घुटमळत होते बाबांच्या समाधीशी...अंतःकरणात भरून उरली बाबांची स्मृती...हृदयाच्या गाभाऱ्यात शांतस्वरूप मूर्ति ठसली..."शिरडी माझे पंढरपूर..." भजनाचे बोल कानी येत होते...कोठून तरी आवाज येऊ लागला...

"साईबाबा बोलो...
साईशाम बोलो...
साईराम बोलो...
आल्लासाई बोलो...
मौलासाई बोलो...

मी धुंद झाले. हात आपोआप जोडले गेले. सहज तोंडातून शब्द बाहेर आले....

"...श्री सच्चिदानंद साईनाथ महाराज की जय"...घंटा नादाच्या सुरात मी शिरडीत जे पाहिलं ते मनात साठवून, आई-दादांसमवेत सुखद स्मृती घेऊन, घराकडे परतू लागले ते फक्त शरीरानेच... !

★ ★ ★

# शिरडी-वृत्त माहे एप्रिल सन १९८०

या महिन्यात श्रींचे दर्शनासाठी बाहेरगावचे बरेच साईभक्त येऊन गेले. काही कलाकारानी श्रीपुढे हजेरी दिली त्यांची नांवे खालील प्रमाणे :—

**कीर्तन :–** १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने एकादशी व इतर धार्मिक महत्वाचे दिवशी झाली.

२) श्रीमती कृष्णाबाई येवलेकर सातारा, यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन :–** १) ह. भ. प. निवृत्तिराव पाटील गोंदकर शिरडी यांचे प्रवचन झाले.

२) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाकचौरे शिरडी यांचे प्रवचन झाले.

**भजन, गायन वादन वगैरे :–** १) सौ. अलका भा. रिसवडकर अंधेरी मुंबई.

२) श्री. पांडुरंग धों. आंबेकर रत्नागिरी.

३) सौ. शोभाताई मा. पागे, सोलापूर.

४) श्री. सत्यसाई सेवा समिती, बलसाड. ५) सौ. सी. एच. नटेश्वरी, हैद्राबाद. ६) श्री. आप्पासाहेब गणपतराव, कोळपेवाडी. ७) श्री. प्रियनाथ गुप्त, कल्हूर. ८) सौ. शकुंतला मो. जोशी, नाशिक. ९) श्रीमती नार्वेकर; अंधेरा. १०) सौ. मीराताई पाऊसकर, औरंगाबाद. ११) श्री. नागेश चुरिया. मंगलूर. १२) श्री. महादेव शं. गोखले, गिरगाव मुंबई. १३) कु. आशा पंडीत, पुणे. १४) कुमारी पद्मजा शं. फेणाणी. १५) कु. विनायक शं. फेणाणी. मुंबई.

**संतभाऊ महाराज पुण्यतिथी :–** दि. १२-४-८० रोजी, संतभाऊमहाराज श्रीसाईबाबांचे एकनिष्ठ भक्त, यांची पुण्यतिथी मोठ्या थाटात साजरी करणेत आली. दुपारी श्रीसाईबाबांची आरती झाल्यावर महाराजांच्या फोटोची मिरवणूक समाधि-मंदिरातून त्यांच्या समाधिजवळ (लेंडी बागेजवळ) गेली. समाधीला स्नान घालून नवीन वस्त्र घालण्यांत आले. त्यानंतर आरती झाली. तीर्थप्रसाद वाटून झाल्यावर गरीबांना भोजन देण्यात आले, रात्री मंदिरात कीर्तन, प्रवचन कार्यक्रम झाला.

**हवापाणी :–**शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# श्रीसाई आशिष । उदीत भरले

श्रीसाई आशिष । उदीत भरले
विश्वासे तरले । भक्तगण
संकल्प प्रोक्षिप्त । उदीत साईचा
सश्रद्ध सिद्धीचा । तापहारी
भाळीलाव उदी । श्रद्धाबळे तारी
भक्तिबळे हारी । संकटेच
हाक देता धावे । भक्तिबळे पावे
अनुभवा घ्यावे । प्रचितीस
सर्वाभूती देव । धर्मी द्वैतभाव
मूळी नसे ठाव । जीवभर
साईबाबा गाता । साई उभापाठी
पाहे भक्तिपोटी । प्रेमभाव
हृदयात वास । साई रामध्यास
जीवा नसे त्रास । नाम घेता
उदीने हारती । संकटे जीवनी
अनुभव जनी । सर्वाभूती

—श्री. विष्णु वासुदेव कौलगेकर

---

# संतश्रेष्ठ साईबाबा

संत सारे सांगताती साधनाती साध्यना
माळदेते वैखरीसी पाहुजाता चालना ॥ ध्रु ॥
रामसाई गातजीवी धुंद होतो भक्ताना
ध्यान लागे अंतरासी भक्तिजीवी दृढना
दृष्टिसाई लावताची एकरूपा जागना ॥ १ ॥
वासना ती दुष्ट जीवी जाळते ना पुण्यना
नाम घेता ज्ञान होते सत्यजीवी पाळना
आसजीवी पूरवीतो पाहूनीया भक्तिना ॥ २ ॥
हृदयासी डोलताना तोच साई राम ना
अमृताचे पान होते नाम घेता मोक्षना
देव नाही दूर कोठे दत्तसाई द्रामना ॥ ३ ॥

—श्री. वि. वा. कौलगेकर

# सुदिन भाग्याचा

सुदिन भाग्याचा । लाभला साई दर्शनाचा ।। धृ ।।
मंदिरात त्या बघता साई । आनंद मनिचा द्विगुणीत होई ।
जीवनातली ही पुण्याई । क्षण मंगल साचा ।। १ ।।
हृदयी साईनाथ बैसले । अंतरंग हे रंगुनी गेले
देहभान हे पहा हरपले । लाभ विभूतीचा ।। २ ।।
नित्य विभूती भाळी लाविता । उभा पाठिसी साईनाथा ।
संकट वारी हरिसी चिंता । लाभच सेवेचा ।। ३ ।।
शिरडी साईची भासे पंढरी । ध्यान धारणा ती दरबारी ।
श्रद्धा असता नच ते दूरी । गजर ( साई ) नामाचा ।। ४ ।।
साईनाथा दावी चरणा । एक मनिची पुरवी कामना ।
तुझिया ध्यानी रमवी या मना । भाव सख्यादासाचा ।। ५ ।।

—श्री. स. मा. मुन्हार
चंदननगर नागपूर ( मेडीकल रोड )

# दिसो लागे मज पंढरीची वाट

जिथे नांदताहे कैवल्याचा थाट
दिसो लागे मज पंढरीची वाट......
भोळा चोखामेळा सांवत्याचा मळा
तुका नामयासी माऊली कृपाळा
बंकाकर्ममेळा कुरवाळी सांवळा
संतांनी दाविली मज पायवाट
तुळशीमाळ गळा चंदनाचा टिळा
साथी संगतीला वारकरी मेळा
भावाचा हिंदोळा धुंडाळे आंधळा
अंतरात नांदे ज्ञानाईची लूट
सुख दुःख भासे उन्हपावसाळा
नाममार्ग मज चालतो पांगळा
अंधारी आधार विठ्ठला दयाळा
तेजात नाहतो चंद्रभागा कांठ

—महादेव द. साने
४२०, सोमवार पेठ, कराड (जि. सातारा)

# साईमंदिरी उठे साई साई निनाद

साई मंदिरी उठे साई साई निनाद
साई नामाने जागी झाली रम्यप्रभात
अश्या मंगलवेळी ऐकू येतो घंटानाद
अमृतमय आनंदाने नाचतो मी आज
भावभक्तिचा फुले फुलोरा आसमंतात
त्याला टाळ चिपळ्या देती एक सुराने साथ
सुगंध वारा नाचतो स्वच्छंदे गगनात
अमृतमय आनंदाने नाचतो मी आज
साईनाथा मी घालीन तुला नित्यसाद
त्यावेळी मला लाभूदे तुझाच प्रतिसाद
असाच राहू दे मला तुझ्या सान्निध्यात
अमृतमय आनंदाने नाचतो मी आज

—श्री. रमाकांत पंडित,
प्रभास्मृति, भाऊदाजी रोड
माटुंगा, मुंबई १९

# पावते समाधी तुझी साईनाथा

श्रद्धा सबुरीची फुले तुज वाहता
पावते समाधी तुझी साईनाथा ॥ धृ ॥
भक्तीभावे कोणी शिरडीस येती
साईदर्शनाने व्यथा दूर होती
कृपाप्रसादाची सत्वशील गाथा ॥ १ ॥
साई चिंतनाने भान हरूनि जावे
विश्वरूप साई अनुभवा यावे
नाम साधनेची अशी ही महन्ता ॥ २ ॥
किती संकटांचे बोचतात काटे
जन्म मानवी हा नको-नको वाटे
क्लेष दूर होती साई आळविता ॥ ३ ॥

—श्री. ग. रा. पालकर
२२३/२, दारुवाला चाळ, बझार वॉर्ड,
कुर्ला, मुंबई क्र. ४०० ०७०

## ‘आस’

आवड आहे संतजनांची,
धर्म क्षेत्रे ती बघण्याची ॥
साई नाथा नाव ऐकिले,
शिर्डी क्षेत्रा ते भुषविले ॥
इच्छा असूनी योग येईना,
तळमळ जीवाची हि थांबेना ॥
‘साईलीला’ वाचीत होते,
उदी महिमा ऐकित होते ॥
जाण्या शिर्डी भाग्य उदेले,
दर्शन सद्‌गुरूचे ते घडले ॥
‘बाबा’ देखिता भान हरपले,
सर्वच विश्व ‘साईराम’ भासले ॥
उदी सेवुनी, उदी लेवुनी,
‘साई’ जप हा रात्रंदिनी ॥
मनी वाटे चमत्कार व्हावा,
साई नाथ नेत्री दिसावा ॥

—इंदू नाईक, लोणावळा

---

## साई स्मरण

मी पामर भाग्यवंत ।
साईनाथ कृपावंत ॥ १ ॥
मी पामर स्मरे निशिदिनी ।
साईनाथ माझा तन्मणी ॥ २ ॥
मी पामर गुंतलो संसारी ।
साईनाथ सुख दुःख पार करी ॥ ३ ॥
मी पामर लागे चरणी ।
साईनाथ मेरुमणी ॥ ४ ॥
मी पामर माझा परमेश्वर ।
साईनाथ दयेचा सागर ॥ ५ ॥
मी पामर त्याचा असे भक्त ।
साईनाथ करील मुक्त ॥ ६ ॥

—डॉ. ग. स. कामत
११९४/१३ शिवाजी नगर पुणे ५

## ॥ साईनाथाय नमः ॥

माझे मनोरथ पूर्ण करी आता
शिरडीनिवासी श्रीसाईनाथा ॥

नको भयचिंता सद्गुरुनाथा
आधीव्याधि नको त्या जगन्नियंत्या
नित्य मज सांभाळी हे दीनानाथा ॥ १ ॥

हृदयी माझ्या नित्य वास करी
मार्ग मज दावी तू निरंतरी
पदोपदी बुद्धि देई हे शिरडीनाथा ॥ २ ॥

—साईदास

---

## श्रीसाईनाथा–दयाघना

श्रीसाईनाथा
स्वीकार या
अभिवादना
अंधारातूनि
प्रकाशाकडे
नेई भक्तांना
दुःख साचे
दूर करी
सुखाची सांवली
देई दयाघना

असता तुझी कृपादृष्टि
मन होई न कधी कष्टी
असू दे अशीच माया
झिजो तुझ्या भक्तीत काया

—उज्वल वामनराव कुळकर्णी
उस्मानाबाद.

# ॐ श्रीसाई नाम जपूया

ॐकार नाम स्मरूया नित्यनेमे भवसागर तरण्यार्थ ।
श्रीरंग सावळा अन् घननीळा हाच की "श्रीसाई समर्थ ॥
साही शास्त्रे–अठरा पुराणे धुंडीता मिळे हाच एक अर्थ ।
ईश्वराचे अवतार सारे सकल विश्व–धर्म संस्थापनार्थ ॥
नारायण तो जागृत आहे कलियुगातही भक्तिभावार्थ ।
मधुसूदनाचे त्या स्तवन करूया षड्‌रिपु-दमनार्थ ॥
जगजेठी साई अखंड राही हृदयकमळी भक्तरक्षणार्थ ।
पुरुषोत्तमाचे त्या भजन करूया तारील श्रीहरी जसा पार्थ ।
यादवराजा कृष्णसख्या शरण मी तुज देई भक्तिसामर्थ्य ॥

# साईबाबा रमावर

साधुया आपापुले हीत नीत "ॐश्रीसाई" स्मरणात ।
ईडापिंगला सुषुम्नेच्या श्वसने चाले आत्मा शरिरात ।
बासरी वाजवी मुरारी याच शरिरी सोहं नादात ।
बाजार सारा दोन दिसाचा घटी भरता सारे भस्मसात ।
रज तम सत्वाच्या चाली जीवनसरिता वाहे दिनरात ।
मायामोहाचा दुस्तर भवसागर तरण्या मात्रा "साईनामात ।
वसुंधरा उदरी "साई" तप करी साक्ष गुरु–स्थानात ।
रघुपती राघवा त्या "साई–सदयाला" दासाचा दंडवत ।

—श्री. विलास पडवळ
शिवनेरी, दादासाहेब फाळके मार्ग
दादर, मुंबई १४

# तुमको लाखो प्रणाम ।

शिरडी के साईबाबा ।
तुमको लाखो प्रणाम ।
तुमको मेरा प्रणाम ।। धृ० ।।

अंगरखेको पहन लिया है ।
सिर कपडेसे ढक लिया है ।
कंधेपर झोली लटकाये ।
बाबा लाखो प्रणाम ।। धृ० ।।

धुनीमाईको प्रकट किया है ।
उसी उदीसे रोग हटाये ।
अघटीत घटना करनेवाले ।
भक्तोंके रखवाले तुमको ।
बाबा लाखो प्रणाम ।। धृ० ।।

भवसारमें नाव फँसी है ।
काम-क्रोधमें गूँथ गयी है ।
आँधीसे बचानेवाले साई ।
भव सागरसे उद्धारो तुम ।
तुमको लाखो प्रणाम ।
तुमको मेरा प्रणाम ।। धृ० ।।

—सौ. सरला सु. गर्जे
८० शिवाजी नगर, पुणे